# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २८, १९४५ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) मृद व जलसंधारण मंत्री**<br>**(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**<br>**(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### मराठवाड्यातील जायकवाडी धरणामध्ये उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणातून पाणी सोडण्याबाबत

**(१) * २१५७३ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १९०५० ला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यांतील शहरांना व गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी मुख्य स्त्रोत्र असलेल्या जायकवाडी धरणामध्ये ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून जायकवाडी धरणामध्ये उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणातून पाणी सोडण्यासाठी जालना जिल्हा नियोजन समितीने बैठकीमध्ये ठराव मंजूर करुनही धरणात पाणी सोडण्यात आले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील २ लाख १० हजार हेक्टरपेक्षा अधिक शेती सिंचनाच्या उद्दिष्टाने तयार करण्यात आलेल्या जायकवाडी प्रकल्पासाठी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणांतून समन्यायी तत्वानुसार जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जालना जिल्ह्यातील पिण्याच्या व शेती सिंचनासाठीच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत असलेल्या हातवण सिंचन प्रकल्पाला सुधारित मान्यता मिळुन दोन वर्षे झाली असून, प्रकल्पासाठी सुध्दा जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली नसून जलजीवन मिशन अंतर्गत साठवण तलाव तसेच बृहत लघु प्रकल्पास विहिरी घेण्यासाठी जलसंधारण व महसूल विभागाकडून शेतकऱ्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने मराठवाड्यातील छोटया-मोठ्या योजनांना मान्यता देण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन जायकवाडी धरणामध्ये ठरावानुसार पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

महामंडळाच्या दिनांक ३०/१०/२०२३ च्या आदेशानुसार दिनांक २४/११/२०२३ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांच्यामार्फत जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागातील धरणातून पाणी सोडण्यात आले आहे.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचेकडून जायकवाडी प्रकल्पासाठी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणातून समन्वयी तत्वानुसार पाणी सोडण्याबाबत दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये दिनांक १९/०९/२०१४ रोजी आदेश देण्यात आले आहेत. हे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/०९/२०१६ च्या आदेशानुसार कायम केले आहेत.

(३) हातवण बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम दिनांक ०७/०५/२०१० रोजी सुरु करण्यात आले. धरणाच्या डाव्या तीरावरील रोधीचराचे काम हाती घेण्यात आले होते. तथापि, संबंधित जमीन मालकांना जमीनीचा दर मान्य नसल्याने सप्टेंबर, २०१० पासून जमीन मालकांनी सतत तीव्र विरोध केल्यामुळे आजपर्यंत काम बंद आहे. सदर प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासन निर्णय दिनांक ०८/०७/२०२१ अन्वये मंजूर झाला असून त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

मौ.हातवण व मौ.बापफळ शिवारातील २०४.१७ हेक्टर व ११८ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन कार्यवाही प्रगत असून पूर्ण झाल्यानंतर धरणाचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

जलजीवन मिशन अंतर्गत साठवण तलाव तसेच बृहत लघु प्रकल्पास विहिरी घेण्यासाठी शेतकऱ्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करतांना दिरंगाई झालेली नाही.

(४) प्रश्न भाग-३ मधील नमूद योजनांना मान्यता अथवा ना-हरकत देण्यास दिरंगाई होत नसल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. महामंडळाच्या दिनांक ३०/१०/२०२३ च्या आदेशानुसार दिनांक ०४/११/२०२३ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांच्यामार्फत जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागातील धरणातून पाणी सोडण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुर्ला महानंदा नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीच्या बांधकामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२) * २१२२३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुर्ला महानंदा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीच्या बांधकामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी तत्कालीन मा.गृहनिर्माण मंत्री यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत करुन चौकशीचे आदेश दिले असता, सदर समितीने या प्रकल्पामध्ये अनियमितता आढळून आल्याने काही शिफारशी सुचविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारशीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकारी वर्गाने नियमबाह्य व धोकादायक बांधकामाकडे हेतूपुरस्पर दुर्लक्ष करून तसेच महानगरपालिकेच्या ना-हरकत प्रमाणपत्राच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केलेले असून सदर इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर त्रिसदस्यीय समितीने इमारतीच्या नियमबाह्य व धोकादायक बांधकामांचे स्थलांतरण करण्याचे निर्देश दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेले असताना देखील उक्त स्थलांतरण करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अन्वये झालेल्या सुनावणी दरम्यान विकासकाला त्याचा झालेला खर्च देण्याचे आदेश देऊन विकासकाला निष्कासन करण्याचे आदेश दिले असूनही याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात मोठ्या प्रमाणात होत असलेल्या नियमबाह्य धोकादायक बांधकामांमुळे आगीसारखे भीषण अपघात घडत असून सदर प्रकल्पात याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी झालेल्या अनियमिततेबाबत नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कुर्ला महानंदा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन इमारतीच्या बांधकामात झालेल्या अनियमिततेच्या चौकशीसाठी उप सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

त्रिसदस्यीय समितीने दिलेल्या निर्देशानुसार आय.आय.टी. पवई यांच्याकडून कुर्ला महानंदा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन इमारतीचे संरचनात्मक लेखा परिक्षण करण्यात आलेले असून त्यांच्या अभिप्रायानुसार समितीने या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामासाठी शिफारशी केलेल्या आहेत.

कुर्ला महानंदा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन इमारत विंग सी व डी साठी सन २०१३ मध्ये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असून योजनेतील एकूण १०९ पात्र झोपडीधारकांपैकी ९६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तर १३ झोपडीधारकांचे पुनर्वसन हे विक्री घटक इमारत विंग ए आणि बी मध्ये प्रस्तावित करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.

त्रिसदस्यीय समितीने दिनांक १४/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कुर्ला महानंदा नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती कामासाठी सुचविण्यात आलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना (Remedial Measures) करण्याबाबत व ड्रेनेज लाईन, लिफ्ट डक्ट, मिटर रुमचे स्थलांतरण व भूमिगत पिण्याच्या पाण्याच्या टाकीबाबत उपाययोजना करण्याबाबत कळविले होते. त्यानुषंगाने विकासकास या इमारतीच्या दुरुस्ती कामासाठी वेळोवेळी झोपुप्रा कडून निर्देश देण्यात आले आहेत. परंतु इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत विकासक व सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्यात समन्वय नसल्यामुळे या इमारतीच्या दुरुस्तीचे काम होऊ शकलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अन्वये दिनांक १८/०७/२०२३ रोजी जारी केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

१. सहनिबंधक/झोपुप्रा यांनी विकासक व सहकारी गृहनिर्माण संस्थेची सुनावणी घेऊन थकीत भाड्याची परिगणना करावी. तसेच विकासकाने थकीत भाडे चार समान हप्त्यात झोपुप्राकडे जमा करावे.
२. कुर्ला महानंदानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेने आयआयटी, पवई यांनी सुचविलेल्या उपाय योजनांनुसार Competent Agency ची नियुक्ती करुन पुनर्वसन इमारतीच्या दुरुस्तीचे काम करुन घ्यावे.
३. संस्थेने दुरुस्ती कामाचे अंदाजत्रक झोपुप्रास सादर करावे.
४. दुरुस्ती कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सहकारी गृहनिर्माण संस्थेने सादर केल्यानंतर इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या प्रगतीनुसार विकासकाने संस्थेने नेमलेल्या एजन्सीच्या बँक खात्यामध्ये दुरुस्ती कामाची रक्कम जमा करावी.

त्यानुषंगाने सहकारी गृहनिर्माण संस्थेस दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे पालन तसेच अंमलबजावणी करण्याबाबत विकासक/ वास्तुविशारद यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून कळविण्यात आलेले आहे.

उन्नत नगर, गोरेगांव (प) येथील जय भवानी संस्थेच्या इमारतीत लागलेल्या आगीमुळे झालेल्या दुर्घटनेबाबत चौकशी करण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. या चौकशी समितीने भविष्यात आगी सारख्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत शिफारशी केलेल्या आहेत. त्यानुसार आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव नगरपालिकेतंर्गत कोटयवधी रूपयांच्या मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याप्रकरणी गुन्ह्याच्या तपासात दिरंगाई होत असल्याबाबत

**(३)** * **२१६८२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपालिकेतील क्रमांक २०१ ते २०३ मोजमाप पुस्तिका या दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२ रोजी गहाळ झाल्या असताना अज्ञात व्यक्तीवर आनंदनगर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०४ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मोजमाप पुस्तिकेमध्ये रस्त्यांची, नाल्यांची बोगस कामे दाखवून कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आलेला असून तपासात काहीही प्रगती नसतानाही वरिष्ठांकडून सदरील प्रकरण इतर चौकशी यंत्रणेकडेही वर्ग करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन मुख्याधिकारी, लेखापाल, शहर अभियंता व ठेकेदार यांनी संगनमत करुन सदरील कामे झालेली नसतानाही देयके अदा करुन लेखा विभागातुन संचिका गायब केल्याचे उघड होवूनही विद्यमान मुख्याधिकाऱ्यांनी अज्ञात व्यक्तीवर उशिरा गुन्हा दाखल करुन आरोपींना जाणिवपूर्वक अभय दिलेले असून पोलीस त्यांना समर्थन देत असल्याने पोलिसांची प्रतिमा मलिन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सुमारे तीन कोटी रूपयांचा अपहार झाला असून सदर अपहाराची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांना समर्थन देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबीत करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) आनंदनगर पोलीस ठाणे, धाराशिव येथे यासदंर्भात गुन्हा नोंदविण्यात आला नाही. मात्र प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन गहाळ वस्तू रजिष्टर ०४४८/२०२३ अन्वये नोंद घेण्यात आली आहे. सदर तक्रारीमध्ये मोजमाप पुस्तिका कोणत्या कामाच्या होत्या याबाबत कोणतीही माहिती नाही.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारे गुन्हा नोंद नसुन केवळ वस्तू गहाळ झालेबाबत गहाळ वस्तू रजिष्टरला नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकरणात कोणत्याही ज्ञात अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल नाही. त्यामुळे कोणाचेही समर्थन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे पोलीसांची यासंदर्भात प्रतिमा मलिन झालेली नाही.

(४) सदर प्रकरणात अर्जदाराने नगर परिषद कार्यालय, धाराशिव येथील लेखा विभागातील मोजमाप पुस्तीका क्र.२०१ व २०३ हे गहाळ झाले बाबत अर्जात नमुद केले आहे.

सदर अर्जात कोणत्याही आर्थिक बाबींचा अगर रकमेच्या अपहाराचा उल्लेख केलेला नाही. तसेच सदर प्रकरणात कोणताही कायदेशीर गुन्हा दाखल नसल्याने तपास करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे बाबरगाव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील बंधाऱ्याच्या दुरूस्तीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४) * २१२९० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५३५१ ला दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बाबरगाव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शिवना नदीवर सन २०१५-१६ मध्ये कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या बांधकामामुळे बंधाऱ्यात समाधानकारक पाणी अडविल्याने परिसरातील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये पावसाच्या पुरामुळे सदर बंधारा वाहून गेल्याने परिसरातील सिंचन क्षेत्र कमी झाले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधारा दुरुस्तीसाठी दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी १ कोटी ७० लाख रुपयांच्या निधीस मान्यता देऊनही अद्याप या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले नसून, सदर कोल्हापूरी बंधाऱ्याच्या योजनांपैकी ८ कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून, एका योजनेचे काम निविदा स्तरावर व उर्वरित सहा कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यास निविदा कार्यवाहीअंती सर्व योजनांची दुरुस्तीची कामे माहे मार्च, २०२३ पुर्वी पूर्ण करण्याचे नियोजित होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मौजे बाबरगाव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) शिवना नदीवरील या विभागाच्या अखत्यारीतील ८ बंधाऱ्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. बाबरगाव को.प.बंधारा वगळता उर्वरीत ७ बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहे. परंतु शासन निर्णय दिनांक १६/०५/२०२३ अन्वये मौजे बाबरगाव को.प. बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाची प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.
(४) मौजे बाबरगाव ता.गंगापुर येथील को.प.बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक नव्याने मंजुरीसाठी वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आलेले आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त होताच प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) येथील पोलीस अधिकारी, कर्मचारी हे आरोपींना पाठीशी घालत असल्याबाबत

**(५) * २२२३५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करगणी, बनपुरी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर काही नराधमांनी अत्याचार केल्याची घटना माहे जून-जुलै २०२३ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेतील आरोपींना अद्याप अटक केली नसल्याने या आरोपींना आटपाडी पोलीस व प्रशासन पाठीशी घालत असून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी पीडितीचे कुटुंबीय व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलीस महासंचालक यांच्याकडे दोन महिन्यापूर्वी केली आहे, हे ही खरी आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने सदर दोषींवर व दोषींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) आटपाडी पोलीस ठाणे, जि.सांगली येथे गु.र.नं.२००/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३७६ (२)(जे), ३७६ (२)(आय), ३७६ (२)(एन), ५०६ सह बालकांचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ८, १२ अन्वये दिनांक १५/०६/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. पिडीतेच्या नावे पोलीस प्रशासनाविरुध्द तक्रार असलेला खोटया मजकूराचा अर्ज पोलीस महासंचालक यांना दिला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(६) * २११४५ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसेसावळी (ता.खटाव, जि.सातारा) येथे १०० ते १५० जणांच्या संतप्त जमावाने केलेल्या दंगलीमध्ये दुकानांची, दुचाकी व चारचाकी वाहनांची जाळपोळ व धार्मिक स्थळाची तोडफोड केली असून यामध्ये एका युवकाचा मृत्यू तसेच १० जण गंभीर जखमीं झाले असून सातारा जिल्ह्यातील वर्धनगड, बनवडी व पुसेसावळी येथे जाणिवपूर्वक जाती-जातींमध्ये तेढ निर्माण करण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्ह्यात काही महिन्यांपासून कायदा व सुव्यवस्थेची गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यास तेथील पोलीस यंत्रणेला अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सातारा जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक १०/०९/२०२३ रोजी एका इसमाने इन्स्टाग्राम अकाऊंटवर आक्षेपार्ह मजकुर प्रसारीत केल्यामुळे त्याच्याविरूध्द औंध पोलीस ठाणे गु.रुपये क्र. २५४/२०२३ भादवि कलम २९५ (अ), १५३(अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर आक्षेपार्ह पोस्टमुळे पुसेसावळी गावातील संतप्त जमावाने मुस्लिम समाजाचे मशिदीवर दगडफेक तसेच वाहनांची जाळपोळ केली. तसेच मशिदीतील लोकांना केलेल्या मारहाणीमध्ये एका युवकाचा मृत्यू झाला व १० जण गंभीर जखमी झाले. त्याबाबत औंध पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २५५/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच माहे जून, २०२३ मध्ये सातारा जिल्ह्यातील वर्धनगड येथे समाज माध्यमांवरील आक्षेपार्ह स्टेटस मुळे तसेच बनवडी येथे इन्स्टाग्रामवरील पोस्टमुळे धार्मिक भावना दुखावतील तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा घटना घडल्या आहेत. त्या अनुषंगाने संबंधितांवर अनुक्रमे पुसेगाव पोलीस ठाणे हददीत गु.र.क्र. १११/२०२३ अंतर्गत व वाठार पोलीस ठाणे हददीत गुर.क्र. १६६/२०२३ अंतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस घटकाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. :-

इंस्टाग्रामवर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल केल्या प्रकरणी संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला, प्रस्तुत घटनेच्या अनुषंगाने अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. तसेच, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सी.आर.पी.सी. कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश, तणावाच्या कालावधीत इंटरनेट सेवा खंडीत ठेवणे, लोकांना सलोखा व शांतता राखण्याचे आवाहन करणे, आवश्यक तो बंदोबस्त ठेवणे व इतर खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या. अशा प्रकारे सातारा जिल्ह्यातील परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात आली असून कायदा व सुव्यवस्था राखण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकरीता कंत्राटी पध्दतीने पोलीस भरतीस मंजुरी दिल्याबाबत

**(७) * २१८२१ श्री.महादेव जानकर, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कंत्राटी पध्दतीने पोलीस भरतीला विरोध असतानाही शासनाने बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाकरीता तीन हजार पोलिसांची कंत्राटी पध्दतीने भरती करण्याकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळास ३० कोटी रुपये वितरीत करण्यास गृह विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदभरती करतांना बिंदू नामावलीचे पालन होणार आहे किंवा कसे याबाबत स्पष्टता करण्यात आलेली नसून अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय उमेदवारांवर यामुळे अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटी तत्वावरील पोलीस भरतीला विरोध असतानाही पोलीस भरती करण्याची कारणे काय आहेत, तसेच कंत्राटी पध्दतीने कायदा व सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी देण्याचा शासनाचा विचार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी पध्दतीत पोलिसांच्या सेवाशर्तींचे स्वरूप व नोकरीची शाश्वती देण्याबाबत तसेच कंत्राटी पध्दतीने करण्यात येणारी भरती रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर ३००० मनुष्यबळाच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे (महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून) घेण्यास शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०४२१/प्र.क्र.११३/विशा-४, दिनांक २४ जुलै,२०२३ अन्वये वित्त विभागाच्या मान्यतेने मंजुरी दिलेली आहे. सदरची सेवा ११ महिन्यांकरीता घेण्यात येणार आहे.

तसेच शासन निर्णय क्रमांक मरासु-०५२३/प्र.क्र.१६०/विशा-४ दिनांक ११ ऑक्टोंबर,२०२३ अन्वये बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर ३००० मनुष्यबळाच्या सेवा बाह्ययंत्रणेकडून (महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ) घेण्याकरिता येणाऱ्या खर्चाकरिता रुपये ३० कोटी इतक्या रक्कमेस पुनर्वितरणाव्दारे प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही. सदर सेवा बाह्ययंत्रणेकडुन (महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडुन) करार पध्दतीने ११ महिन्यांकरीता पुरविण्यात येत असल्याने बिंदू नामावलीचे पालन करणे आवश्यक नाही, त्यामुळे कोणावरही अन्यायाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांची ४०६२३ पदे मंजूर आहेत.त्यापैकी पोलीस शिपाई संवर्गाची सुमारे १०००० पदे रिक्त असून, त्यापैकी ७०७६ पदे भरती प्रक्रिया व प्रशिक्षण पूर्ण होऊन प्रत्यक्ष कर्तव्यासाठी सन २०२५ मध्ये उपलब्ध होणार आहेत. दरम्यानच्या कालावधीत अपुऱ्या मनुष्यबळाची पुर्तता करणे महत्वाचे आहे. याअनुषंगाने बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयासाठी पोलीस शिपाई पदे विहित मार्गाने भरण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत उपरोक्त शासन निर्णय दिनांक २४/०७/२०२३ अन्वये किमान ११ महिने कालावधीसाठी एकूण ३००० मनुष्यबळाच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे (महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ) उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत. सदर सुरक्षा रक्षकांना वाहतूक व्यवस्थापनास मदत व सुरक्षेसंबधीत दुय्यम कामे देण्यात येतील. कायदा - सुव्यवस्था अंमलबजावणी व गुन्हे तपास संबधीत कामे दिलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाज्योती संस्थेतर्फे आयोजित केलेल्या परीक्षेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(८) * २२१३७ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) तर्फे दिनांक ३० जुलै, २०२३ रोजी नियुक्त केलेल्या वुईशाईन टेक प्रा.लि. या कंपनीकडून राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रशिक्षण प्रवेश परीक्षेत ज्ञानदीप नावाच्या पुण्यातील एका खाजगी क्लासेस टेस्ट सिरीजमधील प्रश्न कॉपी करुन प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली असल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे ज्ञानदीप या संस्थेतील मुलांनाच प्रवेश मिळणार असल्याने गडचिरोली, यवतमाळ, नंदुरबार, धुळे, जळगांवसह इतर जिल्ह्यातील मुलांना प्रवेश मिळणार नसल्याबाबतच्या तक्रारी महाज्योती प्रशासन तसेच शासनाकडे केल्या असून सदर परीक्षा रद्द करुन पुन्हा परीक्षा घेण्यासंदर्भात मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त परीक्षा पुन्हा घेण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला तसेच शासनातील संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) तर्फे नियुक्त केलेल्या वुईशाईन टेक प्रा.लि. या कंपनीकडून दिनांक ३० जुलै, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण प्रवेश परीक्षेतील प्रश्न खाजगी क्लासेसच्या टेस्ट सिरीजमधून कॉपी करुन तयार करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत सदरहू कंपनीच्या निष्काळजीपणामुळे परिक्षेत गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्याने सदर परीक्षा रद्द करुन अन्य कंपनीमार्फत नव्याने परीक्षा घेण्यात आली आहे.

तसेच, परीक्षा घेणाऱ्या सदर कंपनीचा कार्यादेश रद्द करण्यात आला आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातून महिला व मुली बेपत्ता होत असल्याबाबत

**(९) * २१५३८ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असून, बोईसर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन दिवसांत तीन मुली बेपत्ता झाल्या असून नागपूर जिल्ह्यात गत आठ महिन्यांत २००० पेक्षा अधिक लोक बेपत्ता झाल्याबाबतच्या तक्रारी नोंदविण्यात आल्या असून यामध्ये १००० पेक्षा अधिक महिला व तरुण मुली व ९४ मुले असून त्यात ९० पेक्षा जास्त अल्पवयीन मुली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात मुलींना विविध आमिष दाखवून पळवून नेण्याचे प्रकारदेखील वाढले असून त्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे, चौकशीच्या अनुषंगाने बेपत्ता महिला व मुलींच्या तपासासाठी स्थानिक पोलिसांनी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. बोईसर एमआयडीसी पोलीस ठाणेमध्ये नोव्हेंबर, २०२३ या महिन्यात अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, नागपूर जिल्ह्यामध्ये (शहर व ग्रामीण) मार्च, २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीमध्ये एकूण ३८३८ व्यक्ती बेपत्ता झाल्याची नोंद असून त्यामध्ये २०११ महिला व २२५ मुले-मुलींचा समावेश आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी बोईसर तसेच नागपूर शहर हद्दीत अल्पवयीन मुलींना पळवून नेण्याचे गुन्हे दाखल असले तरी सदर अल्पवयीन मुली या स्वतः आई वडील रागविल्याने, अभ्यासाच्या कारणावरून मित्र-मैत्रीणीसोबत फिरण्यासाठी तसेच इतर कौटूंबिक कारणास्तव निघून जात असल्याचे गुन्ह्याच्या पोलीस तपासात निष्पन्न होत असते. या कालावधीमध्ये अल्पवयीन मुलींना विविध आमिषे दाखवून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले नाही.

मात्र, नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये सन २०२३ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत विविध आमिषे दाखवून मुलींना पळवून नेण्याचे प्रकार उघडकीस आले असून यामधील जास्तीत जास्त प्रकरणे प्रेम संबंधाचे आहेत. बोईसर एमआयडीसी येथील दाखल ३ गुन्ह्यांपैकी १ गुन्हा उघड झाला असून उर्वरीत गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. नागपूर जिल्ह्यातील गत ८ महिन्यात बेपत्ता झालेल्या व्यक्तींची संख्या ३८३८ इतकी आहे. सदर बेपत्ता व्यक्तींमध्ये २०११ महिला व २२५ मुले-मुलींचा समावेश आहे. सदर बेपत्ता ३८३८ व्यक्तींपैकी ३२३९ व्यक्ती मिळून आले आहेत. उर्वरीत व्यक्तींचा पोलीसांकडून शोध सुरू आहे.

बेपत्ता मुली व लोकांना शोधण्यासाठी पोलीस विभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असतात. यामध्ये सामाजिक सुरक्षा विभाग/अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध विभाग कार्यान्वित ठेवण्यात आले आहेत. नागपूर पोलिसांनी पोलीस ठाणे स्तरावर भरोसा सेल आणि पोलीस दिदी हा उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्ग, झोपडपट्टी, महिला व मुलींचे वसतिगृह अशा ठिकाणी पोलीस दिदींचे पथक भेटी देऊन मुख्यतः किशोरवयीन मुला-मुलींना समुपदेशन करतात. तसेच, “ऑपरेशन मुस्कान”च्या माध्यमातून देखील मिसींग मुलींचा शोध घेण्यात येत असतो. पोलीसांच्या प्रयत्नांमुळे नागपूर शहर पोलीस आयुक्तालयात हरवलेल्या व्यक्तींच्या मिळून आल्याचे प्रमाण ८८ टक्के असून पळवून नेलेल्या व्यक्तींच्या मिळून आल्याचे प्रमाण ९४ टक्के आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या केल्याबाबत

**(१०) * २१६३५ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, डॉ.प्रज्ञा सातव, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथे दिनांक १५ जुलै, २०२३ रोजी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिची हत्या केल्याप्रकरणी मा.उप मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांनी याप्रकरणी कार्यवाही करण्याचे आदेश मा.पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मयत अल्पवयीन मुलीच्या कुटुंबियांचा एकूण ७ व्यक्तींवर संशय असताना स्थानिक पोलिसांनी केवळ तिघांना अटक केली असून, उर्वरित ४ व्यक्तींसोबत आर्थिक व्यवहार करुन त्यांना अटक केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील उर्वरित ४ संशयितांवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यासंदर्भात तसेच सदर प्रकरणातील दोषी आढळून येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करुन निलंबीत करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी अक्कलकुवा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणातील सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय वा किती दिवसात कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

मा.उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्याबाबतचे पत्र दिनांक २४/०८/२०२३ रोजी पोलीस अधीक्षक, नंदुरबार येथे प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी मोलगी पोलीस स्टेशन, जि.नंदुरबार येथे गु.र.नं.१२०/२०२३, भा.द.वि.सं. कलम ३०५, ३५४ (अ), ५०४, ५०० सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८ व १२ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ (C) अन्वये दिनांक १८/०७/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्वरित आरोपींवर गुन्हा दाखल करुन त्यांना तातडीने अटक करण्यासंदर्भात दिनांक २७/०९/२०२३ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते. उर्वरीत ४ संशयीत आरोपींबाबत काहीएक पुरावा निष्पन्न झाला नसून आर्थिक व्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) सदर गुन्ह्यात मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील शेतीस २४ तास वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * २२१७३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १९०७६ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती होऊन देखील वीजमीटर मिळण्यासाठी डिमांड भरूनही अनेक महिने मीटर मिळत नाही तसेच शेतकऱ्यांना कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्यामुळे कृषी पंपांना २४ तास वीज मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही भाग जंगलाने व्यापलेला असल्याने तिथे नेहमी मानव-वन्यजीव यांच्यात संघर्ष पहायला मिळत असून शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळीच वीजपुरवठा दिला जात असल्याने जंगली जनावरांमुळे अनेक शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला असून रात्री शेतीस पाणी देण्यास जाणे धोक्याचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शेतीला इतर उद्योगाप्रमाणे २४ तास वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या नागपुर परिक्षेत्राअंतर्गत एप्रिल, २०२३ ते नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत १,४३,७५३ अकृषक तसेच १९,२५३ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच, एप्रिल, २०२३ ते नोव्हेंबर, २०२३ दरम्यान १,९८,१०० सिंगल फेज व १४,६०५

थ्री फेज मीटर उपलब्ध करुन देण्यात आलेले असून, आज रोजी नागपूर विभागात १,२६,९४१ सिंगल फेज व ४५,८९७ थ्री फेज मीटरचा साठा उपलब्ध आहे.

वीजभार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो. त्यानुसार सद्य:स्थितीत संपूर्ण राज्यात एकूण कृषी भारापैकी सर्वसाधारणपणे ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांवर दिवसा ८ तास व उर्वरीत सुमारे ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांवर रात्री ८ तास अशी वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे.

(३) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा ८ तास वीज पुरवठा देणे हे मुख्य उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून शासनामार्फत "मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनी योजना" अन्वये वितरण उपकेंद्र स्तरावर विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प उभारणीच्या माध्यमातून दीर्घकालीन योजना आखली आहे.

सदर योजनेंतर्गत महावितरण कंपनीने राज्यात १९६७ मे. वॅटचे वीज खरेदी करार केलेले आहेत. त्यापैकी ६११ मे. वॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झालेले आहेत. सदर प्रकल्पांमधून राज्यात एकूण २३९ कृषी वाहिन्यांवरील १,००,८७९ कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. यामध्ये विदर्भामध्ये एकूण २१ कृषी वाहिन्यांवारील १०,२५७ कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास थ्री फेज वीज पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

तसेच, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कार्यक्रमाद्वारे २०२५ पर्यंत कमीत कमी ३०% कृषी वाहिन्यांचे सौरऊर्जा विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट असून, त्याद्वारे डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ७००० मे.वॅट एवढी सौर प्रकल्प क्षमता आस्थापित करण्याचे योजिले आहे.

सद्य:स्थितीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत ३५९० मे.वॅ. क्षमतेसाठी शासकीय जागांवर दोन टप्प्यांमध्ये जिल्हानिहाय स्पर्धात्मक निविदा जाहीर केल्या आहेत. यामध्ये विदर्भातील १७१ उपकेंद्रांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी संस्थानाने साई भक्तांच्या दर्शन रांगेचे आणि शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण करण्याबाबत

**(१२) * २१९८९ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि.अहमदनगर) येथील संस्थानाने साई भक्तांच्या सुविधेसाठी बांधण्यात आलेली दर्शन रांग आणि शैक्षणिक संकुल मागील वर्षभरापासून उद्घाटन अभावी खुले न केल्याने भाविकांची व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर्शन रांगेचे आणि शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण तातडीने करण्याची मागणी भाविक, विद्यार्थ्यांकडून व स्थानिक नागरीकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी संस्थानाने साई भक्तांच्या सुविधेसाठी बांधण्यात आलेली दर्शन रांग आणि शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) शिर्डी संस्थानने साई भक्तांच्या सुविधेसाठी बांधण्यात आलेली दर्शन रांग इमारतीचे मा.प्रधान मंत्री, भारत सरकार यांचे शुभहस्ते दिनांक २६/१०/२०२३ रोजी लोकापर्ण करण्यात आले आहे.
(४) साईबाबा शैक्षणिक संकुल हा प्रकल्प संस्थान मालकीचे गट नं.१८३, मौजे निमगांव कोऱ्हाळे या गांवचे हद्दीमध्ये उभारण्यात आला आहे. तेथील ग्रामपंचायत निवडणुकीची आचार संहीता लागू असल्याने दिनांक २६/१०/२०२३ रोजी मा.प्रधान मंत्री,भारत सरकार यांचेहस्ते लोकार्पण करण्यात आलेले नाही.

-----------------

## सोलापुर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

**(१३)** * **२२१३३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीला सुरळीत व शाश्वत वीजपुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी करण्यात आली असून, राज्यातील ९ जिल्ह्यांमध्ये ८ हजार ४७३ एकर शासकीय जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापुर जिल्ह्यातील उपलब्ध शासकीय जमिनीचा शोध घेऊन सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना दिवसा अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा करण्यासाठी दिनांक ८ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील १४ जिल्ह्यात ३५९० मेगावॅट क्षमतेसाठी १७०३३ एकर शासकीय जमिनीवर दोन टप्प्यामध्ये जिल्हानिहाय स्पर्धात्मक निविदा जाहीर केल्या आहेत.
(२) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० अंतर्गत सोलापूर जिल्ह्यामध्ये ७९ उपकेंद्रांवर १२२ शासकीय जागांसाठी सुमारे १६०० एकर शासकीय जमीन शोधण्यात आली असून सदर जमिनी ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर जमिनी ताब्यात आल्यावर सुमारे ३०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी पुढील निविदांमध्ये समाविष्ट करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनचे लाखो ग्राहक वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(१४) * २१९२६ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनद्वारे एकूण १.६० लक्ष ग्राहक वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असून यामध्ये जवळपास १०९७९१ ग्राहक शेतकरी, ३८७३९ ग्राहक घरगुती, ६२८१ ग्राहक व्यावसायिक, २०२५ औद्योगीक, ५८८ पथदिवे संवर्गातील, ४२२ ग्राहक पाणीपुरवठा योजना संवर्गातील तर २५०७ ग्राहक इतर सवंर्गातील असून अद्याप त्यांना वीज जोडणी मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनकडे निधी उपलब्ध नसल्याने वीज मीटर आणि साहित्याचा तुटवडा असल्यामुळे सदर वीजेची मागणी करणाऱ्या ग्राहकांना विजेचे मीटर व वीज जोडणी करण्यांस अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच वीज जोडणी करण्यासाठी आवश्यक साहित्य तातडीने विभागाला पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसीटी वर्कर्स फेडरेशनद्वारे कोणतेही पत्र महावितरण कंपनीस प्राप्त झालेले नाही. तथापि, महावितरण कंपनीकडील दिनांक ०१/१२/२०२३ पर्यंतची पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ग्राहकांची संख्या घरगुती ग्राहक २६,९२०, वाणिज्य ग्राहक ४,८२२, औद्योगिक ग्राहक २,०४२, कृषी १,०९,०२७ व इतर २,०११ असे एकूण १.४४ लक्ष आहेत. सदर ग्राहकांना वीज कनेक्शन देण्याचे काम महावितरणमार्फत सुरु आहे. महावितरणतर्फे दरवर्षी सुमारे १२ लक्ष ग्राहकांना नवीन वीज जोडणी देण्यात येते.

(२) व (३) महावितरणमार्फत सन २०२२-२३ करीता नवीन वीज जोडणी (NSC Scheme) अंतर्गत १,१३७.१८ कोटींचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. महावितरणला नवीन वीज जोडणी तसेच जुने व नादुरूस्त मीटर बदलविण्यासाठी प्रतिवर्षी साधारणतः २० लक्ष सिंगल फेज व २ लक्ष थ्री फेज मीटरची आवश्यकता भासते. यासाठी महावितरणमार्फत नियमितपणे सिंगल व थ्री फेज मीटरची खरेदी ई-निविदेच्या माध्यमातून करण्यात येते.

महावितरणमार्फत ई-निविदाअंतर्गत वीज मीटर पुरवठादारांना माहे मार्च-२०२३ मध्ये १२ लक्ष सिगल फेज व २.५ लक्ष थ्री फेज इतक्या वीज मीटरच्या पुरवठ्याचे कार्यादेश देण्यात आले होते. सदर पुरवठादारांकडून सन २०२३-२४ मध्ये आजपर्यंत १०,५९,९९८ सिंगल फेज व २,५०,००० थ्री फेज वीज मीटर पुरविण्यात आले आहेत. उर्वीरत १,३९,००२ सिंगल फेज वीज मीटरचा पुरवठा माहे-नोव्हेंबर, २०२३ अखेरपर्यंत अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत महावितरणच्या विविध मध्यवर्ती व क्षेत्रिय भांडारात सिंगल फेज-५,८२,५६६ व थ्री फेज २,१६,७३९ इतका साठा उपलब्ध असून, साहित्याचा तुटवडा नाही.

याव्यतिरिक्त, केंद्रसरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेंतर्गत (RDSS) २२४.६१ लक्ष नवीन स्मार्ट मीटर खरेदीसाठी सहा निविदिकांना निविदा देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव येथील प्रांत अधिकारी यांना धमकी देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(१५)** * **२१८६७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील प्रांत अधिकारी यांनी हद्दपारीची कार्यवाही केली याचा राग आल्याने एका आरोपीने त्यांचे निवासस्थानावर जाऊन राग आल्याने धमकी दिल्याची घटना दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

उपविभागीय अधिकारी, जळगाव यांनी दिनांक २२/०९/२०२३ जळगाव तालुका पोलीस स्टेशन कडील अभिलेखावर असलेल्या एका प्रकरणातील आरोपीचा हद्दपार प्रस्ताव मंजूर केला होता.त्याचा राग मनात ठेऊन त्याच दिवशी सदर प्रकरणातील आरोपीने उपविभागीय अधिकारी हे कर्तव्यावर असताना त्यांना भ्रमनध्वनीवरुन ‘मला हद्दपार कसे काय केले’ याबाबत वरचे आवाजात विचारणा केली. तसेच त्यानंतर त्याच दिवशी पुन्हा आरोपीने त्याच्या एका साथीदारासह संबंधित अधिकारी यांना त्यांचे राहते शासकीय निवास्थानाचे गेट लावण्यापासून रोखले तसेच सदर प्रकरणातील आरोपीस हद्दपार का केले ? म्हणुन धाक/ भिती दाखवण्याचा प्रयत्न केला.
(२) सदरहु प्रकरणी संबंधित अधिकारी यांनी सदर प्रकरणातील आरोपीं विरुध्द दिनांक २३/०९/२०२३ रोजी तक्रारी अर्ज रामानंदनगर पोलीस स्टेशन येथे दाखल केल्यानंतर अदखलपात्र गुन्हा रजि नं.८१५/२०२३ भादंवि. कलम १८९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेकामी त्याचा शोध घेतला असता मिळुन आलेला नाही. सदर आरोपी मिळून आल्यास त्याचेवर योग्य ती परीणामकारक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## मराठवाड्याकरीता नदीजोड प्रकल्पाव्दारे सिंचन योजना राबविण्याबाबत

**(१६)** * **२१६८८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यामध्ये जल नियोजनाकरीता जायकवाडी प्रकल्पानंतर एकही मोठा धोरणात्मक प्रकल्प प्रत्यक्षात राबविला नसल्यामुळे मराठवाड्यातील शेती उत्पादनामध्ये वाढ न होण्याच्या कारणांपैकी सिंचनाचे फसलेले नियोजन हे एक मुख्य कारण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीसाठी उत्तम जल आणि पीक नियोजन केल्याशिवाय मराठवाड्यात समृद्धी येणे शक्य नाही, हे स्पष्ट असतानाही वेळोवेळी विविध शासनकर्त्यांनी केवळ घोषणा देऊन शेतकऱ्यांना सिंचन प्रकल्पांबद्दल आमिष दाखविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्याच्या जल प्रकल्पांसाठी भांडवली गुंतवणूक किती, कशी आणि कुठून करणार याबाबत काहीही जाहीर झालेले नसताना सिंचन योजना या केवळ कागदांवरच असल्याने प्रत्यक्षात बऱ्याच योजनांच्या प्राथमिक सर्वेक्षणाची कामेही झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नदीजोड प्रकल्पाद्वारे मराठवाड्यातील वर्षानुवर्षे असलेली दुष्काळाची स्थिती सुधारुन मराठवाड्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

जायकवाडी प्रकल्पानंतर १) उर्ध्व पेनगंगा प्रकल्प, २) मांजरा प्रकल्प, ३) निम्न तेरणा प्रकल्प, ४) निम्न दुधना प्रकल्प, ५) जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ (माजलगांव धरण), ६) विष्णूपूरी प्रकल्प, ७) निम्न मानार असे एकूण ७ मोठे प्रकल्प पूर्ण करण्यात आले असून सदर प्रकल्पांद्वारे जून, २०२२ अखेर ३.८९ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही. तथापि, शासनाच्या प्रचलित नियमांनुसार बांधकामाधीन व प्रस्तावित प्रकल्पांसाठी जलसंपदा विभागाच्या अर्थसंकल्पानुसार नियत व्ययामध्ये साधारणत: २५% ची तरतूद गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासाठी केली जाते.

तसेच गोदावरी खोऱ्यांसाठी प्रस्तावित योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतिपथावर आहे.
(४) पश्चिम वाहिनी नदी खोऱ्यातील पाणी पूर्वे कडील गोदावरी खोऱ्यात वळविणेसाठी दमणगंगा-एकदरे-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व पार गोदावरी असे तीन नदीजोड प्रकल्प प्रस्तावित आहेत.

यापैकी दमणगंगा (एकदरे)-गोदावरी (वाघाड) नदी जोड प्रकल्प, ता.पेठ, जि.नाशिक या योजनेद्वारे एकात्मिक जल आराखड्यामध्ये असलेल्या तरतुदीनुसार ७.१३ अघफु अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. तसेच दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देव) नदीजोड प्रकल्प ता.मोखाडा, जि.पालघर या योजनेद्वारे ५.०५ अघफु अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. या योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय जल विकास अभिकरण, नाशिक यांच्याद्वारे प्रगतीत असून अनुक्रमे डिसेंबर, २०२३ व जानेवारी, २०२४ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार पाणी उपलब्धतेत बदल संभावतो.

वरील दोन्ही योजनांमधून मिळणारे पाणी हे सध्या उपलब्ध होणाऱ्या पाण्याव्यतिरिक्त असल्याने उर्ध्व गोदावरी (जायकवाडीपर्यंत) खोऱ्यातील तुट भरुन येण्यासाठी उपयोगी होणार आहे.

तसेच पार गोदावरी उपसा वळण योजनेद्वारे ३.४२ अघफु पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे. या योजनेचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले असून सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे सादर आहे.

उपरोक्त नदीजोड योजनांना राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झालेनंतर राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल यांचे निदेशानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील रेड लाईट भागासह रहिवासी इमारतीत व मसाज पार्लरमध्ये सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाबाबत

**(१७) * २१११९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहराच्या विविध भागात गत सहा महिन्यांमध्ये झटपट पैसा कमविण्यासाठी तसेच उतारवयात खर्च भागविण्यासाठी वेश्या व्यवसाय चालविला जात असून महिलाच महिलांचा सौदा करित असल्याची बाब दिनांक १ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वेश्या व्यवसायामध्ये अडकलेल्या ६८ तरुणींची सुटका मुंबई पोलिसांनी केली असून त्यात तीन अल्पवयीन मुलींचा समावेश असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील रेड लाईट भागासह रहिवासी इमारतीत, तसेच मसाज पार्लरमध्ये राजरोसपणे सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्तालय, मुंबई अंतर्गत अशा प्रकारच्या काही गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.
(२) माहे मार्च, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत पोलीस आयुक्तालय, मुंबई अंतर्गत वेश्याव्यवसाय चालविणाऱ्यां विरोधात एकूण ४६ गुन्हे दाखल करण्यात आले असून १८१ महिला (१७९ प्रौढ महिला व २ अल्पवयीन मुली) यांची सुटका करुन एकूण ५६ पुरुष व ३२ महिला आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.
(३) मुंबईतील रेड लाईट भागासह रहिवाशी इमातीत, तसेच मसाज पार्लरमध्ये राजरोसपणे सुरु असलेल्या वेश्या व्यवसायाला आळा घालण्यासाठी भारतीय दंड विधान सहिंता सह अनैतिक मानवी व्यापार (प्रतिबंधक) अधिनियम १९५६ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात अनैतिक मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

त्याअन्वये मुंबई पोलीस आयुक्तालयात माहे मार्च, २०२३ ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | शिर्षक | एकूण दाखल गुन्हे | अटक आरोपी | | सुटका करण्यात आलेल्या महिला | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | प्रौढ महिला | अल्पवयीन महिला |
| १ | रेडलाईट भागात | १५ | २४ | ०८ | ७५ | ०० |
| २ | रहिवाशी इमारती मध्ये | १४ | ०७ | १७ | ३० | ०२ |
| ३ | मसाज पार्लरमध्ये | १७ | २५ | ०७ | ७४ | ०० |
| एकूण | | ४६ | ५६ | ३२ | १७९ | ०२ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील सदनिकांच्या खरेदी विक्रीतील गैरव्यवहार रोखण्याबाबत

**(१८) * २१२३७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून एका कुटुंबाला एक सदनिकेचा लाभ घेता येत असतानाही नियमांचे उल्लंघन करुन अनेक झोपडपट्टीधारकांनी खोटी, बनावट कागदपत्रे सादर करुन, एकापेक्षा अधिक सदनिका घेतले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पात १३ हजारांहून अधिक सदनिका बेकायदेशीररित्या खरेदी केले असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतील अनेक प्रकल्पांच्या विकासकांनी झोपडपट्टीधारकांचे पर्यायी घरांचे भाडे थकीत ठेवले असून घरांचा गैरव्यवहार रोखण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नवीन संगणकीय प्रणाली विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातंर्गत येणाऱ्या प्रकल्पातील सदनिकांच्या खरेदी-विक्रीतील गैरव्यवहार रोखून मूळ लाभार्थ्यांना त्यांच्या सदनिका वितरीत करण्याबाबत तसेच नवीन संगणकीय प्रणाली विकसित करुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) एका कुटुंबाला एका सदनिकेचा लाभ घेता येत असतानाही कुटूंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींची पात्रता केल्याची ७ प्रकरणे व एकाच व्यक्तीची दुबार पात्रता केल्याची ७ अशी एकूण १४ प्रकरणे झोपुप्राच्या निदर्शनास आली असून, या १४ प्रकरणांमधील पात्रता रद्द केलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) झो.पु. प्राधिकरणाच्या दिनांक २७/१०/२०२३ रोजीच्या परिपत्रक क्र. २१४ नुसार झोपडीधारकांची पात्रता ठरविण्यासाठीचे परिशिष्ट-२ हे यापुढे स्वयंचलित परिशिष्ट-२ प्रणालीव्दारे (Auto Annexure-२ Software) पारीत करण्यात येणार आहे. ही कार्यवाही करताना, यापूर्वी पारीत करण्यात आलेल्या जुन्या परिशिष्ट-२ मधील झोपडीधारकांचा डेटा (Data) हा OCR (Optical Character Reader) व्दारे डिजीटायजेशन (Digitization) करुन, स्वयंचलित परिशिष्ट-२ प्रणालीला लिंक (Link) करण्यात येणार असल्याने, पात्रतेचा दुबार लाभ घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या झोपडीधारकांची सदरहू Software मध्ये तात्काळ माहिती मिळू शकणार असल्याने, झोपडीधारकास सदनिकांचा दुबार लाभ घेता येणार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इस्लापूर आणि देगलूर (जि.नांदेड) पोलीस ठाण्याच्या हद्दीत पंचतारांकित जुगार अड्डे चालविण्यात येत असल्याबाबत

**(१९) * २१७२४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील इस्लापूर आणि देगलूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पंचतारांकित जुगाराचे अड्डे चालविण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी तेलंगणा राज्यातील मोठ्या प्रमाणात व्यापारी जुगारासाठी येत असून त्यांच्या सेवेसाठी पंचतारांकित अनधिकृत जुगारी अड्डे चालविण्यात येत असतानाही स्थानिक प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देगलूर (जि.नांदेड) पोलीस ठाण्याच्या हद्दीत चालविण्यात येत असलेले पंचतारांकित जुगाराच्या अड्डयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

नांदेड जिल्हा सीमावर्ती भागातील महाराष्ट्र राज्यातील देगलूर पोलीस ठाणे, जि.नांदेड च्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे पंचतारांकित अथवा इतर जुगाराचे अड्डे चालु असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) नांदेड जिल्हा सीमावर्ती भागातील महाराष्ट्र राज्यातील देगलूर पोलीस ठाणे, जि.नांदेड च्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे पंचतारांकित अथवा इतर जुगाराचे अड्डे चालु नाहीत. तथापि, माहे जानेवारी ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत पोलीस स्टेशन देगलूर हद्दीत चोरुन लपुन पत्यावर जुगार खेळत असल्याबाबत दोषी व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे एकूण ४ गुन्हे

दाखल करण्यात आली आहेत. सदर ४ गुन्ह्यांमध्ये ३४ आरोपीं विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यात आली असून एकूण ४६,१४०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस स्टेशन देगलुर हद्दीत कोणत्याही प्रकारच्या जुगाराची माहिती मिळताच तात्काळ दखल घेऊन पोलीसांमार्फत नियमित कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील धरणांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * २२१२४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड : दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १३८२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करणाऱ्या काळू धरणाचे काम गत १२ वर्षांपासून प्रलंबित असून जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत सदर प्रकल्पामुळे बुडीत होणारी खाजगी जमीनीच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय

(२) असल्यास, अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यात असलेल्या कुशिवली धरणाच्या बांध कामास विलंब झाला असून धरण बांधकामासाठी लागणाऱ्या २० कोटी रूपयांच्या खर्चामध्ये १७७ कोटींची वाढ झाली असल्याचे तसेच चिखलोली धरणाच्या उंची वाढीचे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तिनही धरणांचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) कुशिवली प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावाबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतचा शेरेपुर्तता अहवाल कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या दिनांक १०/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. तसेच, वनजमीन मान्यता प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर धरणाचे काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

चिखलोली (जांभिवली) धरणाच्या उंची वाढविण्याचे काम करण्यात येत आहे. सदर धरणाच्या उंचीवाढ कामासहीत रुपये ५०.९२ कोटी इतक्या रकमेचे सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक १६/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये नगरविकास विभागास सादर केले आहे.

काळु प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्याकरीता सदर प्रकल्पाचा मा.मुख्यमंत्री यांच्या वॉर रुम मध्ये समावेश करण्यात आला आहे. वन जमिनीची अंतिम मान्यता मिळणेसाठी नक्त वर्तमान मुल्य (NPV) रुपये ३९६.४४ कोटी इतका निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (MMRDA) प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने वन विभागाच्या शेऱ्यांची पूर्तता करुन सदर निधी वन विभागास जमा करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहमदनगर येथील सीताराम सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना मारहाण केल्याबाबत

**(२१) * २१९६४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर येथील सीताराम सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक व सामाजिक कार्यकर्ते श्री.हेंरब कुलकर्णी यांनी शाळेच्या परिसरातील गुटखा दुकाने हटविल्या प्रकरणी ते दुचाकीवरुन जात असताना काही समाजकंटकांनी दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान मारहाण केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने आरोपींना अद्याप अटक करुन सबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

प्रश्नाधीन घटना दिनांक ०७/१०/२०२३ रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) प्रश्नाधीन घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी श्री.हेरंब कुलकर्णी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलीस ठाणे, अहमदनगर येथे गु.र.नं. १४७४/२०२३ भा.दं.वि. कलम ३४१, ३२४, १२० (ब), ३४ प्रमाणे दिनांक ०७/१०/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी मिळाली आहे तसेच १ विधीसंघर्षीत बालकास मा.न्यायालयाच्या आदेशान्वये त्याच्या पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच सदर गुन्ह्याच्या तपासात श्री.कुलकर्णी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने हल्ला केला असल्याचे त्यांच्या जबाबावरुन व उपलब्ध पुराव्यावरुन निष्पन्न होत असल्याने दिनांक ०९/१०/२०२३ रोजी सदर गुन्ह्यास भा.दं.वि.कलम ३०७ प्रमाणे वाढीव कलम लावण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या निवासी आश्रमशाळांना शासकीय अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(२२) * २२२८२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत ११६७ आश्रमशाळा चालविल्या जात असून प्रत्येक आश्रमशाळेत किमान ३२० विद्यार्थी निवासी स्वरुपात शिक्षण घेत आहेत, सदर आश्रमशाळेतील सुमारे पावणेचार लाख विद्यार्थ्यांसाठी प्रतिविद्यार्थी दरमहा दीड हजार रुपये संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळांना दिले जाणारे शासकीय अनुदान मागील २-३ वर्षापासून देण्यात आले नसल्याचे तसेच सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अनुदानाचे टप्पे देखील संस्थांना मिळाले नसल्याचे दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनुदान व अनुदान टप्पे आश्रमशाळांना न देण्याची कारणे काय आहेत तसेच सदरचे अनुदान वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागातंर्गत विजाभज प्रवर्गाच्या प्राथमिक ५२९, माध्यमिक ३०० व उच्च माध्यमिक १४८ अशा एकूण ९७७ खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळा चालविण्यात येतात. पैकी प्राथमिक आश्रमशाळेत (वर्ग १ ते ७) १२० विद्यार्थी, माध्यमिक आश्रमशाळेत (वर्ग ८ ते १०) १२० व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत (वर्ग ११ वी १२ वी) ८० विद्यार्थी त्यानुसार प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक असे तीन विभाग (Unit) ज्या आश्रमशाळेत असतील तेथे ३२० विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत. राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळांतील १,०३,५१२ निवासी विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी प्रती माह रुपये १५००/- इतके परिपोषण अनुदान दिले जाते.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे. सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयांच्या मागणीनुसार राज्यातील आश्रमशाळांना खालीलप्रमाणे वेतनेतर अनुदान अदा करणेत आले आहे.

| आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पिय तरतूद (रुपये कोटी) | सुधारीत अंदाज (रुपये कोटी) | प्रत्यक्ष खर्च (रुपये कोटी) |
|---|---|---|---|
| २०१९-२० | १४०.०० | १६५.०० | १३५.९३ |
| २०२०-२१ | २५५.०० | १७७.५० | १३६.०९ |
| २०२१-२२ | २५५.०० | १९१.२५ | १२०.०९ |
| २०२२-२३ | २००.०० | १४०.०० | १४०.०० |
| २०२३-२४ | २२५.०० | -- | ११०.०० |

सद्य:स्थितीत कोकण, नाशिक अमरावती व नागपूर विभागात सन २०१९-२० ते २०२२-२३ या कालावधीतील सर्व विजाभज खाजगी अनुदानित आश्रमशाळांचे वेतनेतर अनुदान अदा करण्यात आले आहे.

तथापि, पुणे, लातूर व छत्रपती संभाजीनगर विभागातील काही आश्रमशाळांचे वेतनेतर अनुदान संबंधित संस्थाकडून मागील खर्चाचे विवरण (Assessment) विलंबाने सादर केल्याने व मंजूर निधी खर्च झाल्यामुळे प्रलंबित आहे. सदर अनुदान अदा करण्यासाठी सन २०२३-२४ मध्ये अर्थसंकल्पीय निधीपैकी रुपये ११२.५० कोटी म्हणजेच ५०% इतका निधी ऑगस्ट, २०२३ मध्ये वितरीत करण्यात आला होता.आता दिनांक ०७/१२/२०२३ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये रुपये ६७.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी रुपये १८०.०० कोटी म्हणजेच ८० % इतका निधी आश्रमशाळांना वेतनेतर अनुदानापोटी वितरीत करण्यात आला आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## वाणगाव (जि.पालघर) येथे बनावट कागदपत्रे बनवून शेतजमीनच्या विक्रीचे व्यवहार करून आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२३)** * **२२३६६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाणगाव (जि.पालघर) येथील बनावट कागदपत्र दस्तावेज बनवून शेतजमीनीच्या विक्रीचे व्यवहार करून आर्थिक फसवणूक करणाऱ्या अमित भालचंद्र चुरी तसेच इतर जमीन विक्रीचे व्यवहार करणाऱ्या सात जणांवर ठाणे येथील नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाणगाव येथील जमीन विक्रीच्या व्यवसायासंदर्भात दस्तऐवज बनावटीकरण, फसवणूक इ.गुन्हे असलेल्या आरोपींना पोलिसांनी अटक केली नसल्याची तक्रार ठाणे पोलीस आयुक्तांकडे दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करुन किती जणांना अटक करण्यात आली वा करण्यात येत आहे, तसेच संबंधित दोषींना अटक करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु. र.क्र. २४२/२०२३ भादवि कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४६९, ४७१, ३४, दिनांक १२/०८/२०२३ अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर प्रकरणी ६ आरोपींना सीआरपीसी कलम ४१ (अ)(१) प्रमाणे नोटीस बजावण्यात आली असून सदर प्रकरणाचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील खाजगी स्कूल व्हॅन चालकाने विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन केल्याबाबत

**(२४)** * **२२४६९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील शाळेतून घरी येत असताना खाजगी स्कूल व्हॅन चालकाने विद्यार्थिनीसोबत गैरवर्तन केल्याची संतापजनक घटना दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईसह राज्यात अशा प्रकारच्या निंदनीय घटना सातत्याने घडत असल्याने विद्यार्थिनींची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेतील दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत तसेच मुंबईसह राज्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता तसेच शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, टिळकनगर पोलीस ठाणे गु.र.क्र.५६१/२०२३, कलम ३६३, ३५४, ३५४ (अ) भा.द.वि. सह कलम ८, १२ पोस्को ॲक्ट अन्वये दिनांक २५/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्यातील आरोपी अटक असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सर्व पोलीस घटकात पोलीस ठाणे पातळीवर पोलीस काका, पोलीस दीदी संकल्पना राबवून शैक्षणिक ठिकाणी भेटी देऊन महिला व बालकांवरील अत्याचाराबाबत जागृती करण्यात येत आहे. महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी महिला छेडछाड विरोधी पथके स्थापन करण्यात आली आहे. शाळा सुटण्याच्या व भरण्याच्या वेळी शाळेच्या ठिकाणी हद्दीत निर्भया पथकाची तसेच इतर गस्ती वाहनांची गस्त वाढविण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षित करण्यासाठी स्कुल व्हॅनवर महिला मदतनिसाची नेमणुक करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांना सुरक्षिततेबाबत प्रशिक्षण व शिबिरे आयोजित करण्याबाबत शाळांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्याबाबत

**(२५) * २२५२३ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात १०० मुले आणि ५० मुली असे १५० विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून वसतिगृहाच्या कामांना गती देण्यासाठी ज्या जिल्ह्यामध्ये जागा उपलब्ध होण्यास अडचणी येत आहेत तिथे खाजगी संस्थाकडून विविध निवडणूक प्रक्रिया राबवून तातडीने भाडेतत्त्वावर वस्तीगृह सुरू करावे असे निर्देश आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्देशाच्याअनुषंगाने मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी तातडीने वसतिगृह सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय हे खरे आहे.

(२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.सारथी-२०२३/प्र.क्र.१०१/ का.१४२५-अ, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२३ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतिगृहे संकुल योजना अंतर्गत खाजगी नोंदणीकृत संस्थांचे वसतिगृह चालविण्यास तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेशी संलग्नीत करून सदर योजना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अंमलात आणण्यास मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयामध्ये नमूद केले नुसार खाजगी इमारतीमधून शासन निकषानुसार वसतिगृहे सुरू करणेसाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थेची निवड करणेची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती कडून करण्यात येत आहे."

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा आणि विदर्भातील स्टील उद्योगाला मिळणाऱ्या सवलती पूर्ववत चालू ठेवण्याबाबत

**(२६) * २२७१० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मराठवाडा आणि विदर्भातील डी आणि डी प्लस क्षेत्रातील स्टील उद्योगाला सन २०२४ पर्यंत विविध सवलती व अनुदान देण्याचा सन २०१९ मध्ये घेतलेला निर्णय माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान रद्द केल्यामुळे सदर उद्योगांवर त्याचा विपरीत परिणाम होऊन ते बंद होत असल्याने या सवलती पुन्हा लागू न केल्यास उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत करण्याचा इशारा उद्योजकांनी शासनाला दिल्याचे माहे ऑक्टोंबर २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील स्टील उद्योजकांना विविध सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वीजदर वाढीमुळे स्टील उद्योजकांचा इतर राज्यात जाण्याचा इशारा अशा आशयाची बातमी दैनिक मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळण्याकरीता व या विभागामध्ये सध्या कार्यरत असलेले उद्योग सुरू रहावेत तसेच अधिकाधिक नवीन उद्योग यावेत व या विभागामध्ये उद्योग क्षेत्राचा विकास जलद गतीने होण्यासाठी माहे एप्रिल, २०१६ पासून वीजदरात सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील उद्योगांना देण्यात येणाऱ्या वीजदर सवलतीचा दरामध्ये सुसुत्रिकरण करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक २३/०६/२०२२ अन्वये सुधारीत वीजदर सवलत जाहीर केलेली आहे. सदर निर्णयानुसार पात्र औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणारी वीजदर सवलत, औद्योगिक ग्राहकांच्या त्या त्या आर्थिक वर्षाच्या वीज वापरावर त्या त्या आर्थिक वर्षात रुपये १२०० कोटींच्या मर्यादेत, अर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अधीन राहून देण्यात येईल. तसेच, सदर वीजदर सवलतीचा कालावधी दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत असणार आहे. सदर

वीजदर सवलत योजनेंतर्गत स्टील उद्योगांना सन २०२२-२३ मध्ये ४९५.५५ कोटी व सन २०२३-२४ (माहे-ऑक्टोबरपर्यंत) मध्ये ३६६.२१ कोटी इतकी सवलत देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयान्वये वीजदर सवलत रद्द करण्यात आली नसून, त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

यात्व्यतिरिक्त महाराष्ट्रातील औद्योगिक ग्राहकांना, इलेक्ट्रिक आर्क फर्नेससह चालणाऱ्या उच्चदाब पोलाद उद्योगांसाठी उच्चदाब औद्योगिक वर्गवारीसाठी मंजूर केलेल्या मागणी आकाराच्या ७५% मागणी आकार, रात्रीच्या कालावधीतील वीज वापरावर (टाइम ऑफ डे) प्रती युनिट रुपये १.५० सवलत, लोड फॅक्टर सवलत (१५% पर्यंत), वाढीव वीज वापर ०.७५ प्रति केव्हीएएच इतकी सुट, ठोक वीज वापर सवलत (१ ते २%), एका पाळीत चालणाऱ्या उच्चदाब औद्योगिक ग्राहकांना स्थिर आकारात सवलत (४०%), त्वरीत वीज बिल भरणा सवलत (१%), इत्यादी सवलती देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीला निकृष्ट दर्जाच्या कोळशाचा पुरवठा होत असल्याबाबत

**(२७)** * **२२२६१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज निर्मिती कंपनीला स्वच्छ कोळशाचा पुरवठा न करता जी १५ दर्जाचा कोळसा पुरवठा करण्यात आल्यामुळे मे.रख्माई कोल वॉशरीजची १५ दिवसासाठी बंद करण्यात आलेली रॅक लोडिंग पुन्हा सुरु करण्यात आली असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ कोळशाचा वापर केल्यामुळे वीजनिर्मिती संच अधिक क्षमतेने चालतात व प्रदूषण कमी होण्यास मदत होते यासाठी खाजगी कोल वॉशरीजना कंत्राट देण्यात येते मात्र खाजगी कोल वॉशरीज कडून राज्य वीज निर्मिती कंपनीला निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवठा करुन चांगल्या दर्जाचा कोळसा खुल्या बाजारात विकला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवठा करुन शासनाचे कोटयावधी रुपयांची फसवणुक करणाऱ्या कंपनीचे कंत्राटदारांवर गुन्हा नोंदविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीला जी-१५ दर्जाचा कोळसा पुरवठा करण्यात आला नसून जी-१३ (मासिक भारीत सरासरीचा) दर्जाचा कोळसा पुरवठा करण्यात आलेला आहे त्यामुळे मे.रख्माई कोल वॉशरीजची १५ दिवसासाठी या कारणामुळे बंद करण्यात आलेली रेक लोडिंग पुन्हा सुरु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

माहे ऑगस्ट-२०२३ मध्ये भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकरीता रख्माई कोल वॉशरीज मधून धुतलेला कोळसा पाठवण्यासाठी रेकचे डिसपॅच (Dispatch) प्रोग्रॅम रेल्वे प्रशासनाला दिलेले होते. तथापि, कोराडी औष्णिक केंद्रात कोळश्याची कमतरता असल्यामुळे, सदर कोळसा भुसावळ ऐवजी कोराडीला देण्याची रेल्वे प्रशासनाला कळविण्यात आले. त्याकरीता रेल्वे प्रशासनाला १५ दिवस कालावधी लागला आहे.

(२) हे खरे नाही.

औष्णिक वीज केंद्रांना पुरविल्या जाणाऱ्या धुतलेल्या कोळशाची गुणवत्ता तृतीय पक्ष एजन्सीद्वारे नियमितपणे तपासले जाते. जर गुणवत्ता ही कंत्राटातील निकषानुसार मिळाली नाही तर दंडात्मक कारवाई केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलीस उपनिरीक्षक संवर्गतील पदांचा निकाल प्रलंबित असल्याबाबत

**(२८) * २१३१० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२० मध्ये पोलीस उपनिरीक्षकाच्या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिरात प्रसिध्द करुन परीक्षा घेतल्या असून ६५० पदांपैकी ५८५ परिक्षार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला असून मराठा समाजातील ६५ EWS प्रवर्गातील निकाल अद्याप जाहीर केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन स्तरावर SEBC TO EWS असे रुपांतर करुन इतर जाहिरातीचा निकाल जाहीर करण्यात आला परंतु पोलीस उपनिरीक्षक पदाचा निकाल अद्याप जाहीर करण्यात न आल्याने EWS विद्यार्थ्यामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस उपनिरीक्षकांच्या पदांच्या जाहिरातीतील सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) प्रवर्गातील आरक्षणाच्या अनुषगांने उद्भवलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे सद्यास्थितीत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक ( EWS) प्रवर्गासाठी राखून असलेल्या ६५ पदांचा निकाल राखीव ठेऊन तात्पुरती निवड यादी आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इतर जाहिरातीप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक या संवर्गतील ६५ पदांचा निकाल जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २८/०२/२०२० रोजी राज्यातील पोलीस उप निरीक्षक या संवर्गाची ६५० पदे भरण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर पदांमध्ये ६५ पदे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाची व ८५ पदे सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाची अंतर्भूत होती. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाच्या आरक्षणास मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती विचारात घेऊन शासनाने दिनांक २३/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक किंवा खुल्या प्रवर्गाचा

पर्याय देण्यात आला व निवड प्रक्रिया राबविण्यात आली. तथापि, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक ०२/०२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासन निर्णय दिनांक २३/१२/२०२० अन्वये पर्याय देण्याबाबत घेण्यात आलेला निर्णय अग्राह्य ठरविला. मा.न्यायाधिकरणाच्या सदरहू निर्णयापूर्वी मंत्रालयीन सहायक कक्ष अधिकारी व वस्तु व सेवा कर आस्थापनेवरील राज्य कर निरीक्षक या पदांचे निकाल जाहीर करण्यात आले होते. मात्र पोलीस उपनिरीक्षक या पदाची निवड प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने मा.न्यायाधिकरणाच्या दिनांक ०२/०२/२०२३ रोजीच्या निर्णयाचा परीणाम या पदाच्या निकालावर झाला.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या सदरहू निर्णयाविरुध्द राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल केलेले असून सद्य:स्थितीत सदरहू अपिल न्यायप्रविष्ट आहे. उपरोक्त नमूद न्यायालयीन प्रकरणे व त्यामध्ये झालेली क्लिष्टता यामुळे सन २०२० मधील परिक्षेचा निकाल जाहीर करणे शक्य नव्हते व पर्यायाने सन २०२१, सन २०२२ मध्ये झालेल्या परिक्षांचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगास जाहीर करता येत नव्हता.यावर उपाययोजना म्हणून महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब परीक्षा २०२० च्या जाहिरातीमध्ये नमूद ६५० पदांपैकी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील ६५ पदांचा निकाल राखीव ठेवून ५८५ पदांचा निकाल जाहीर करण्यात आला. या निर्णयामुळे पुढील वर्षातील परिक्षांचा निकाल लावणे शक्य झाले. सद्य:स्थितीत शासन निर्णय दिनांक २३/१२/२०२० अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक किंवा खुल्या प्रवर्गाचा देण्यात आलेल्या पर्यायासंदर्भात प्रकरण मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट असल्याने व सुनावणीच्या अंतिम टप्यात असल्याने, शासनाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाच्या ६५ पदांचा निकाल राखून ठेवण्याबाबत घेतलेला निर्णय योग्य आहे. सद्य:स्थितीत यामध्ये बदल केल्यास न्यायालयीन प्रकरणांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाजगी सचिवांच्या नावाने ई-मेल आयडी तयार करून महावितरणच्या अधिकाऱ्यांना बदलीचे बनावट आदेश पाठविण्यात आल्याबाबत

**(२९) * २२१५२ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांच्या नावाने बोगस ई-मेल आयडी तयार करून तसेच काही लोकप्रतिनिधींचे देखील लेटर हेड व खोट्या सह्या करून बदल्यांची व इतर कामे करून महावितरणच्या अधिकाऱ्यांना बदलीचे बनावट आदेश पाठविण्यात आल्याबाबत याप्रकरणी सायबर पोलिसांनी मिरज येथील मोहम्मद इलियास या तरुणाला अटक केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर व दोषींना पाठीशी घालणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे,

राज्याचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांच्या नावाने बोगस ईमेल आयडी तयार करुन तसेच काही लोकप्रतिनिधीचे देखील लेटर हेड व खोटया सह्या करुन विनंती बदली साठी बनावट शिफारसपत्र महावितरण कंपनीचे CMD, सहायक महाव्यवस्थापक यांचे ई-मेल आय.डी. वर पाठविल्या याप्रकरणी सायबर पोलीसांनी येथील मोहम्मद इलियास रा.मिरज या तरुणाला दिनांक ०४/१०/२०२३ रोजी अटक केली आहे.

(२) होय, सदर प्रकरणी नोडल सायबर पोलीस ठाणे, महाराष्ट्र सायबर, मुंबई येथे दिनांक ०३/१०/२०२३ रोजी गुन्हा नोंद क्रमांक ११/२०२३, कलम ४६५, ४६७, ४६८, ४६९, ४७१, ४१९, ४२०,१२०(ब) भा.दं.सं.सह कलम ६६(क),६६ (ड) आय. टि. ॲक्ट २०००-२००८ अन्वये नोंद केला असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे व गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिहे कठापूर उपसा योजनेच्या कामात कार्यकारी अभियंता यांनी आर्थिक अनियमितता केल्याबाबत

**(३०) * २१९७४ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) येथील जिहे कठापुर उपसा सिंचन योजना कार्यान्वित असून कार्यकारी अभियंता यांनी योजनेच्या अंदाजपत्रकापेक्षा वाढीव किंमतीस कंत्राट देऊन कामाचे कार्यारंभ आदेश (Work Order) निर्गमित करुन संबंधित कंत्राटदारास ५० कोटीचे देयक अदा केल्याचे तसेच इतर कंत्राटदारांकडून कामाच्या वर्क ऑर्डर्स ५ टक्के दराने घेऊन सुमारे रुपये १० कोटी कमिशन घेतल्याचे तसेच जिहे कठापूर योजना बारमाही चालु ठेवून शासनाला रुपये ३ कोटी विद्युत देयकासाठी खर्च करुन कार्यकारी अभियंता यांनी आर्थिक अनियमितता केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी शासनाकडे वारंवार तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी परिसरातील बांगलादेशींना बनावट कागदपत्रांच्या आधारे रेशनकार्ड बनवून देणाऱ्या टोळीवर कारवाई केल्याबाबत

**(३१) * २२१४० श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी परिसरात नौशाद या रेशन दुकान चालक व त्याच्या अन्य दोन साथीदारांनी बांगलादेशी नागरीकांना बनावट कागदपत्रांचा वापर करून अवघ्या ८ हजार रुपयेमध्ये रेशनकार्ड बनवून शिधा मिळवून देण्यास मदत करित असल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाच्या (एटीएस) ठाणे युनिटने सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर, पुणे भिवंडी परिसरात बनावट कागदपत्रांचा वापर करून बांगलादेशी नागरिकांचे रेशनकार्ड बनविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने भिवंडी परिसरातील रेशन दुकान चालक व त्याच्या अन्य दोन साथीदारांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) भिवंडी परिसरातील बनावट रेशनकार्ड प्रकरणी नौशाद रईस अहमद शेख याच्यासह इतर दोन आरोपींविरुध्द निजामपुरा पोलीस ठाणे, भिवंडी येथे दिनांक २३/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली आहे, मात्र या प्रकरणी बांग्लादेशी नागरिकांना बनावट कागदपत्रांचा वापर करुन बनावट शिधापत्रिका बनवून दिल्याचे तपासात अद्यापपर्यंत निष्पन्न झालेले नाही.

नागपूर शहरात बांग्लादेशी नागरिकाचे बनावट शिधापत्रिका बनविल्याप्रकरणी पोलीस ठाणे तहसिल येथे दिनांक २४/०२/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दिनांक १७/०४/२०१८ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

पुणे परिसरात अशी घटना निदर्शनास आलेली नाही.

(३) निजामपुरा पोलीस ठाणे, भिवंडी येथे दाखल गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी शिधावाटप कार्यालय, भिवंडी येथे कार्यरत असलेल्या लिपीकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २५/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे यासंदर्भात पोलीसांकडून अधिक तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या कामांच्या निविदा एकाच कंत्राटदारास देण्यात आल्याबाबत

**(३२) * २१३७० श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या निविदेमध्ये दुसऱ्या कंत्राटदाराला निविदा मिळू नये याकरीता तीन कंत्राटदार एकत्र येऊन अधिकाऱ्यांशी संगनमत करुन कोटयवधी रुपयांची कामे मिळवीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये एका कंत्राटदाराला कोणत्याही स्पर्धेशिवाय १० कोटी रुपयांची कामे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथील प्रस्तावित कामांच्या निविदा प्रक्रियांमध्ये पारदर्शकता आणण्याबाबत तसेच निविदेतील संबंधित दोषी अधिकारी-कर्मचारी-कंत्राटदार यांच्यावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात निविदाप्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येते. माहे ऑक्टोबर-२०२३ मध्ये एकूण ४३ निविदांच्या ४३ कार्यदेशात एकूण ३३ कंत्राटदार असून त्यांची एकूण किंमत रुपये ४१.६६ कोटी आहे. सर्व निवेदेची रक्कम कर वगळता रु १० कोटी पेक्षा कमी आहेत.

(२) हे खरे नाही.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील सन २०२२- २३ या आर्थिक वर्षात रुपये ४४६.६५ कोटी किमंतीच्या ७८५ निविदा काढण्यात आल्या असून त्यामध्ये २२५ कंत्राटदारांचा समावेश आहे. यापैकी रुपये १९६.४३ कोटी रकमेच्या १९० निविदेत १० कंत्राटदारांना देण्यात आलेल्या विविध कार्यादेशातील एकूण रक्कम रुपये १० कोटीपेक्षा जास्त रकमेची आहे. यापैकी एकूण रुपये ८.९८ कोटी रकमेचे ५ कार्यादेश ५ वेगवेगळ्या कंत्राटदारांना एकल निविदेवर (सिंगल बिडिंग) देण्यात आलेल्या आहेत व त्या शासनाच्या खरेदी धोरणा नुसार पुनर्निविदा करून देण्यात आलेला आहे.

उर्वरित ५९५ कार्यादेश २१५ निविदाधारकांना देण्यात आले असून त्यांची किंमत रुपये २५०.२२ कोटी आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील ३५ गावांच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * २२०१० प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील टेंभू व म्हैसाळ योजनेंतर्गत ३५ गावांच्या पाण्याचा प्रश्न प्रलंबित असून हजारो शेतकरी या योजनेपासून वंचित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ३५ गावांना शेतीच्या सिंचनासाठी आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शासनाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर टेंभू व म्हैसाळ योजनेंतर्गत ३५ गावांना पाणीपुरवठा करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

मंगळवेढा तालुक्यातील ३५ गावांपैकी ११ गावांचा समावेश कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये असून सदर ११ गावांना कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या म्हैसाळ योजनेमधून पाणी देण्यात येत आहे.

उर्वरीत २४ गावांचा समावेश मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या नव्याने प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये करण्यात आला असून योजनेचा रुपये ६९७.७१ कोटी किंमतीचा नव्याने प्रशासकीय मान्यता अहवाल महामंडळाकडून शासनास प्राप्त झाला असून, शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शेरेपुर्ततेसह महामंडळाच्या दिनांक ३०/११/२०२३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील काळम्मावाडी (दूधगंगा) धरणाच्या दुरुस्तीवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केल्याबाबत

**(३४)** * **२२५८४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील काळम्मावाडी (दूधगंगा) धरणाचे काम १९८३ साली पूर्ण झाले असून धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर काही वर्षातच म्हणजे १९९९ साली धरणाला गळती लागली असून धरणाची गळती प्रती सेकंद ५० ते ९० लिटर होती मात्र कालांतराने हि गळती प्रति सेकंद ३५० लिटर पर्यंत जाऊन पोहोचली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १८ वर्षांपासून या धरणाची गळती काढण्याचे काम सुरू असूनही दरवर्षी या कामासाठी ५- २५ कोटी रुपयांची तरतूद केली जाऊनही गळती बंद झालेली नाही, आतापावेतो धरणाच्या दुरुस्तीस जवळपास १०० कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धरण दुरुस्तीच्या कामांमध्येच अनियमिता होत असल्याबाबत आजपर्यंत झालेल्या दुरुस्तीच्या कामांची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने काळम्मावाडी धरणाचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित अधिकारी तथा कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

काळम्मावाडी दगडी धरणाचे काम सन १९८५ ते सन १९९९ मध्ये पूर्ण करण्यात आले. सन १९९९ ते २०१३ या कालावधीत गळती प्रतिबंधक कामे केल्यानंतर धरणातून होणारी गळती कमी होऊन ती ३९८ लि/से वरून (सन १९९९) सन २०१५ मध्ये ती ११५.९२ लि/से इतकी झाली होती. तद्नंतर गळतीच्या प्रमाणात परत वाढ होऊन सन २०२३ मध्ये ३६२.८० लि/से इतकी झाली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

सन १९९९ ते २०१४ या कालावधीमध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम करण्यात आले असून त्यावर रुपये १५.२३ कोटी इतका खर्च झालेला आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या आर्थर रोड कारागृहातील कैदयाला ड्रग पुरविल्याबाबत

**(३५) * २१११२० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील आर्थर रोड कारागृहात एका पोलीस हवालदाराकडूनच अतिसुरक्षा सर्कल २ मधील एका कैदयाला ड्रगचे कॅप्सुल पुरविले जात असल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणातील दोषी पोलीस हवालदारावर कठोर कारवाई करण्यासह पोलिसांकडूनच होणाऱ्या कायदेभंगाच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई मध्यवर्ती कारागृहाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले कारागृह शिपाई यांच्याकडे दिनांक ०६/१०/२०२३ रोजी मुख्यव्दारावर झडतीवेळी हिरव्या रंगाची गांजा सदृष्य वनस्पती आढळून आली आहे.

(२) सदर प्रकरणी संबंधित कारागृह शिपाई यांच्याविरूध्द ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे एन.डी.पी.एस. अधिनियम, १९८५ चे कलम ८(सी), २०(बी) IIA अन्वये दिनांक ०७/१०/२०२३ रोजी गु.र.क्र. ५९७/२०२३, असा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात संबंधितास अटक करण्यात आली आहे. तसेच सदरहू गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधित कारागृह शिपाई यांना त्यांच्या प्रकरणी सक्षम प्राधिकारी असलेले अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून कार्यालयीन आदेश दिनांक १०/१०/२०२३ अन्वये शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

कारागृहात प्रतिबंधित वस्तु येऊ नये याकरीता हॅन्ड मेटल डिटेक्टर, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर इ. तांत्रिक साधनांव्दारे कारागृहात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्ती, वस्तू व वाहनाची तपासणी करण्यात येते. कारागृहात मोबाईल जॅमर बसविण्यात आले असून सी.सी.टी.व्ही.व्दारे लक्ष ठेवण्यात येते. कारागृहाचा परिसर व बॅरेकची वेळावेळी विशेष झडती घेण्यात येते. पोलीस यंत्रणेच्या श्वान पथकामार्फत कारागृहाच्या आतील भागाची तपासणी करण्यात येते. सर्व कारागृह अधिकारी/कर्मचारी यांना मासिक बैठकीच्यावेळी कारागृहात प्रतिबंधित वस्तू जाणार नाहीत याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील एलआयसीच्या मालकीच्या इमारती धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(३६) * २१७४९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात एलआयसीच्या मालकीच्या ६८ इमारती धोकादायक स्थितीत असून यामध्ये फोर्ट, गिरगाव, दादर, माटुंगा येथील इमारतींचादेखील समावेश असल्याने या इमारतींमधील रहिवाशांनी पुनर्विकास करण्याची मागणी करूनही एलआयसी आणि म्हाडा प्रशासनाने दखल न घेतल्याने शेकडो रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलआयसीच्या धोकादायक स्थितीत असलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी झालेल्या बैठकीत मा.गृहनिर्माण मंत्री यांनी आढावा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एलआयसीच्या मालकीच्या व दुरवस्था झालेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय,हे खरे आहे.

(३) सदर बैठकीत मा.गृहनिर्माण मंत्री महोदयांनी म्हाडा अधिनियम सुधारित कलम ७९ (अ) अंतर्गत धोकादायक इमारतींना नोटीस बजावणे तसेच दरम्यानच्या कालावधीत एलआयसीतर्फे भाडेकरु/रहिवाशी यांचेवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येऊ नये असे निर्देश दिले आहेत. म्हाडामार्फत कलम ७९ (अ) अंतर्गत ४७ इमारतींना नोटीस देण्यात आलेल्या आहेत. तसेच, म्हाडाने एलआयसी यांना सदर इमारतीचा पुनर्विकास लवकर सुरु करण्याबाबत विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुंटेफळ (ता.आष्टी, जि.बीड) येथील साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रातील भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकाराबाबत

**(३७)** * **२२४८९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुंटेफळ (जि.बीड, ता.आष्टी) येथील साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रातील ४५ हेक्टर भूसंपादन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार झाल्याची लेखी तक्रार अप्पर मुख्य सचिव, जलसंपदा विभाग तसेच जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधीक्षक अभियंता, जलसंपदा औरंगाबाद विभाग यांनी कार्यकारी अभियंता, ना.म.का.वि.क्र.२,छत्रपती संभाजीनगर यांनी भूसंपादित जमीन खरेदी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी ३५ कोटी रुपये निधी वर्ग करण्यात आलेला होता, तो निधी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे वर्ग करण्यासाठी दिनांक ८ मे, २०२३ रोजी पत्र दिले असताना कार्यकारी अभियंता यांनी १७ कोटी रुपये जमिनीची खरेदी न करता परस्पर वाटप केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने साठवण तलावाच्या संपादित प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

अधीक्षक अभियंता, जलसंपदा औरंगाबाद विभाग यांनी कार्यकारी अभियंता, ना.म.का.वि.क्र.२, छत्रपती संभाजीनगर यांना खुंटेफळ, ता.आष्टी येथील साठवण तलावाच्या बुडीत क्षेत्रातील भूसंपादित जमीन सरळ खरेदी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी केलेल्या मागणीनुसार रुपये ३५.०६ कोटी निधी वर्ग करण्यात आला. त्यापैकी त्यांनी रुपये १७.१५ कोटी मोबदला मागणी केलेल्या प्रकल्पबाधीतांना महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२/०५/२०१५ मधील २अ प्रमाणे दिनांक ११/०४/२०२३ रोजी वाटप केला. तद्नंतर अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ कार्यालयाने भूसंपादन प्रक्रियेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने तक्रारींची शहानिशा करणे आवश्यक असल्याने सदर निधी

जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे वर्ग करण्याबाबत कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र.२ यांना दिनांक ८/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच सदर निधी उप विभागीय अधिकारी पाटोदा यांचेकडे वर्ग करणे योग्य राहील असे अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ कार्यालयाने दिनांक १९/०५/२०२३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले आहे.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०६/०६/२०२३ च्या पत्रान्वये योग्य ती चौकशी करुन आपल्या स्तरावरुन कारवाई करण्यात यावी असे अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना निदेशीत केले. त्यानुसार संपादक संस्था म्हणून जलसंपदा विभागाने निवाड्यातील इतर घटकांच्या मुल्यांकनाची फेरतपासणी करुन सादर केलेल्या माहितीनुसार दिनांक १४/०७/२०२३ रोजी उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांनी सुधारीत निवाडा जाहीर केला. त्यानुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१७ नुसार उर्वरित मावेजा देवून थेट खरेदीखत करुन भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कार्निवल ग्रुप प्रा. लि. या कंपनीने पुरवठादारांच्या केलेल्या फसवणुकीबाबत

**(३८) * २२३९३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मल्टिप्लेक्स एंटरटेनमेंट हॉस्पिटलिटी नावाने व्यवसाय करणाऱ्या कार्निवल कंपनीने त्यांच्या छोट्या-मोठ्या पुरवठादारांना दिलेले चेक न वटल्यामुळे या पुरवठादारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली असून यापैकी संचालक, ए. एम सर्विसेस, यांनी सन मार्च २०२० पासून आजमितीस रुपये १ कोटी १९ लाखांची व त्यावरील व्याजाच्या रकमेची फसवणूक झाल्याप्रकरणी दिनांक २१ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास पोलीस उपायुक्त, मुलुंड मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंतनगर, पोलीस ठाणे, घाटकोपर यांचेकडे तक्रार नोंदवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रार नोंदविण्यात आल्यानंतरही पोलीस प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही होत नसल्याने श्री.अजय गणपत म्हात्रे, यांनी दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सविस्तर निवेदन सादर करून दिनांक १४ ऑगस्ट, २०२३ रोजी कार्पोरेट क्षेत्रातील फसवणूक थांबविण्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे कुटुंबासमवेत उपोषण करुन फसवणूक करणाऱ्या श्रीकांत भसी यांचा पासपोर्ट रोखण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अजय म्हात्रे व अन्य पुरवठादारांची थकीत रक्कम परत मिळवून देण्याबाबत व संबंधित गुन्हेगारांच्या विरोधात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) असे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.

(३) मे. कार्निवल फिल्म प्रा.लि. कंपनी अंतर्गत असणारी मे. सिनेमा व्हेंचर प्रा.लि. ही कंपनी दि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (एन.सी.एल.टी.),मुंबई शाखा-४ यांनी दिवाळखोर म्हणून घोषित केले असल्याने श्री.अजय म्हात्रे यांनी कंपनीच्यावतीने दि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (एन.सी.एल.टी.) यांच्याकडे रुपये १,१३,८२,४१५ /- रकमेचा क्लेम दाखल केला असल्याबाबत श्री.अजय म्हात्रे यांनी माहिती दिली आहे.

तसेच कार्निवल फिल्म प्रा.लि. कंपनी अंतर्गत इतर कंपन्यादेखील दिवाळखोर म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया दि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल (एन.सी.एल.टी.), मुंबई शाखा ४ येथे चालु असून सदरचे प्रकरण दि नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल (एन.सी.एल.टी.) मध्ये न्यायप्रविष्ट आहे. सकृतदर्शनी सदरचे प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याने तक्रारीच्या अनुषंगाने कागदोपत्री पुरावा प्राप्त करुन चौकशी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पंतप्रधान आवास योजनेत शहरी विभागाची कामगिरी असमाधानकारक असल्याबाबत**

**(३९) * २२५४२ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेमध्ये शहरी विभागाची कामगिरी असमाधानकारक असल्याबाबत केंद्र शासनाने नाराजी व्यक्त केली असून या योजनेसाठी नेमलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्तीबाबत साशंकता निर्माण झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेसाठी नेमलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागारांच्या नियुक्तींमध्ये बोगस पदवीधारक अभियंता, व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी, संगणक शिक्षिका आणि लिपिक यांना तांत्रिक सल्लागार हे पद बहाल करताना केंद्राने निश्चित केलेली शैक्षणिक अर्हता, अन्य शर्तीचे उल्लघंन करण्यात आले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या गृहनिर्माण विभागाने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेले अनेक सदस्य निकषात बसत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पंतप्रधान आवास योजनेच्या राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार नियुक्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांना गती देण्याबाबत केंद्र शासनाने कळविले आहे.

या योजनेसाठी नेमलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागारांच्या (SLTC) नियुक्त्यांबाबतची बातमी वर्तमानपत्रात व प्रसार माध्यमांत प्रसिध्द करण्यात आली होती.

(२), (३) व (४) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार (SLTC) ची नियुक्ती म्हाडा मार्फत करण्यात आली असल्याने म्हाडाने चौकशी समिती गठीत केली होती. म्हाडा प्राधिकरणांतर्गत नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल दिनांक ०४/१२/२०२३ रोजी शासनास प्राप्त झाला असून सदर अहवाला संदर्भात संस्करण सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बिअरच्या दराबाबत शासनाने नेमलेल्या समितीबाबत

**(४०) * २२७२१ श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७०६ ला दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे महसुली उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने उत्पादन शुल्क विभागाकडून निरनिराळे प्रयत्न करण्यात येत असून देशातील आसाम, दिल्लीसह इतर राज्यांनी विक्री होणारे मद्य क्युआर कोडच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक सिस्टीममध्ये प्रकल्प राबविल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली असून बनावट मद्य विक्रीस आळा बसला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिअरचे दर कमी करण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास समितीची नियुक्ती केली असून अमरावती, नागपूर आणि नांदेड या तीन विभागातील बियर पासून मिळणाऱ्या महसुलांमध्ये मोठी घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मद्यातून मिळणारे उत्पन्न वाढवण्यासाठी दिल्ली, ओरिसा व इतर राज्यांनी अवलंबलेली क्यू आर कोड प्रणाली यंत्रणा महाराष्ट्रात राबवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रणाली लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

राज्याचे महसूली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने उत्पादन शुल्क विभागाकडून निरनिराळे प्रयत्न करण्यात येत आहेत. तथापि, इतर राज्यांनी केवळ होलोग्राम/क्युआर कोड च्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक प्रणाली राबविल्यामुळे त्यांच्या महसूली उत्पन्नात भरघोस वाढ झाल्याचे निश्चितपणे अनुमान काढता येत नाही.

(२) अंशत: खरे आहे.

इतर राज्यातील बिअरबाबतच्या धोरणांचा अभ्यास करुन महसूल वाढीच्या दृष्टीने शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १९/१०/२०२३ अन्वये समिती स्थापन करण्यात आलेली आहे. तथापि, बिअरवरील उत्पादन शुल्क कमी करण्यात आलेले नाही.

अमरावती, नागपूर व नांदेड या विभागामध्ये माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत बिअर विक्रीमध्ये घट झालेली नाही. तसेच, राज्यास एप्रिल ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत बिअर विक्रीच्या उत्पादन शुल्कापोटी रुपये २०३४.७८ कोटी इतका महसूल प्राप्त असून गतवर्षीच्या तुलनेत १२% वाढ आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विभागाच्या कामकाजात सुलभता आणण्याकरीता व उत्पादन शुल्क महसूल वाढीकरीता राज्यात सद्य:स्थितीत मद्य उत्पादकापासून ठोक विक्रेता ते किरकोळ विक्रेता या वितरण साखळीमध्ये प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply Chain Management) ही संगणकीय

प्रणाली कार्यान्वित आहे. तसेच इतर राज्यात कार्यरत असलेल्या व इतर आधुनिक प्रणालींचा अभ्यास करुन राज्यामध्ये ट्रॅक ॲण्ड ट्रेस प्रणालीची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भ व मराठवाड्यातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४१) * २१६९८ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १९३१४ ला दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनविषयक गरजा भागविण्यासाठी, उत्पादन व उद्योग प्रकल्पांच्या दृष्टीने महत्वाचा असलेला वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजना प्रकल्प प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेअभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम ११ (च) अन्वये प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक असून, सदर प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मान्यता तसेच इतर वैधानिक मान्यता मिळण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळण्यास विलंब होत असल्याची कारणे काय आहेत,
(४)असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने वैनगंगा-नळगंगा तसेच इतर नदीजोड प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

विदर्भातील अवर्षण प्रवण भागात सिंचन / बिगर सिंचनासाठी पाणी देवून सिंचन अनुशेष कमी करणे व शेतकऱ्यांना, सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रुपये ८८,५७५ कोटी अंदाजपत्रकीय किंमतीचा (सन-२०२२-२३ नुसार) वैंनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्प अहवालाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास मार्च-२०२३ मध्ये सादर झालेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत प्रस्ताव महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचेकडे मान्यतेसाठी सादर आहे.
(३) प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीत असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरगा (जि.धाराशिव) तालुक्यातील कोळसुर ते तुरोरी प्रकल्पादरम्यानच्या जोड कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) * २१२५१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.धाराशिव) तालुक्यातील कोळसूर मध्यम प्रकल्पांतर्गत कर्नाटक राज्यातून पाणी येत असून सांडव्याद्वारे प्रकल्पातील अतिरिक्त पाणी वाहुन जाऊ नये याकरीता सन १९९५ ला कोळसूर ते तुरोरी प्रकल्प असा ५ कि.मी.चा जोड कालवा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जोड कालव्याची दुरवस्था झाली असून झाडे झुडपांमुळे तुरोरी प्रकल्पात पाणी येण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जोड कालव्याची दुरुस्ती लवकरात लवकर केल्यास उमरगा, तुरोरी, चिंचोली, दाबका व मुलज या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असून, सिंचन क्षेत्रात देखील वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जोड कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

कोळसुर ते तुरोरी जोड कालवा हा ४.७० किमी चा असून कोळसूर प्रकल्पातून अतिरिक्त पाणी तुरोरी मध्यम प्रकल्पात सोडले जाते.

(२) होय, हे खरे आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये यांत्रिकी विभागामार्फत मशिन उपलब्ध करुन जोड कालव्याचे काम चालु केले आहे. साधारण १.५ किमी पर्यंत झाडेझुडपे व गाळ काढून पूर्ण करण्यात आले आहे. परंतु कालव्यामध्ये सद्य:स्थितीत पाणी व गाळ असल्याने उर्वरीत काम हे सन २०२४-२५ उन्हाळयामध्ये करणे नियोजित आहे. तरी सदरील काम हे या वर्षाच्या पाखरण कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) सदर प्रयोजनाकरीता ज्यावेळी तुरोरी प्रकल्पामध्ये मुबलक पाणीसाठा नसेल व कोळसूर लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले असेल त्यावेळी या पाण्याचा लाभ मिळू शकतो.

(४) सप्टेंबर, २०२३ मध्ये यांत्रिकी विभागामार्फत मशिन उपलब्ध करुन जोडकालव्याचे काम चालू केले आहे. साधारण १.५ किमी पर्यंत झाडेझुडपे व गाळे काढून पूर्ण करण्यात आले आहे. कालव्यामध्ये सद्य:स्थितीत पाणी व गाळ असल्याने उर्वीरत कामे हे सन २०२४-२५ उन्हाळयामध्ये करणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जत (जि.सांगली) तालुक्यातील वीज वितरण सुरळीत होत नसल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४३) * २१३७८ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेती, पशुपालनावर होत असून, तालुक्याच्या पश्चिम भागात म्हैशाळ योजनेतून पाणी आले असून, तेथे वीज वितरण सुरळीत होत नसल्यामुळे शेतकरी बांधवांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जत तालुक्यातील शेतकऱ्यांना नियमितपणे पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करून रोहित्रे (डी.पी.) दुरुस्त करण्याबाबतची मागणी तसेच वीज ग्राहकांना लवकरात लवकर वीज जोडणी देण्यासंदर्भातील अनेक मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी जत महावितरण कार्यालयासमोर दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जत (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांना वीज वितरण सुरळीत करून ग्राहकांना वीज जोडण्या देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

सांगली जिल्ह्याअंतर्गत जत तालुका हा दुष्काळग्रस्त भाग होता.सदर भागात पाण्याची उपलब्धता नसल्याने विजेचा वापर कमी होत होता. तथापि, सदर भागात म्हैशाळ योजनेचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे या भागामध्ये शेतीकरीता पाणी उपसा करणेसाठी विजेच्या मागणीमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे या भागात वीज यंत्रणा अतिभारीत झालेली असून, विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जत तालुक्यात माहे एप्रिल, २०२३ ते नोव्हेंबर, २०२३ अखेर नादुरुस्त झालेले एकूण ७०१ रोहित्र आजअखेर पूर्णपणे बदलण्यात आलेली आहेत. तसेच, कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत ० ते ३० मीटर अंतरामधील ११२५ कृषीपंपांना, ३१ ते २०० मीटर अंतरामधील ५२० कृषीपंपांना व २०१ ते ६०० मीटर अंतरातील पैसे भरून प्रलंबित असलेल्या एकूण ९९६ कृषीपंपांना स्वतंत्र रोहित्र उभारणी करुन वीज जोडणी देण्यात आली आहे.

जत तालुक्यातील मार्च, २०१८ पर्यंत पैसे भरून प्रलंबित असलेल्या कृषीपंपांना उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत (HVDS) एकूण २४०० कृषीपंपांना वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच, ऑगस्ट २०२३ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ३१ ते २०० मीटर अंतर असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याकरीता महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतामधून रुपये २१.२० कोटी इतका निधी सांगली जिल्ह्यास देण्यात आला असून वीज जोडणी देण्याची कार्यवाही चालू आहे.

याव्यतिरिक्त, जत तालुक्यातील विद्युत प्रणालीचे बळकटीकरण करण्यासाठी उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत (RDSS) ६ नविन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र तसेच ८ उप केंद्रामध्ये अतिरिक्त पॉवर ट्रॉन्सफार्मर बसविणे व नविन १४९७ वितरण रोहित्र उभारण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नलवडेवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील साठवण तलावाच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४४) * २११८१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नलवडेवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथे सन २०२२-२०२३ मध्ये रुपांतरीत साठवण तलाव बांधताना संबंधित ठेकेदार व अधिकारी यांनी खर्चापेक्षा जास्त रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नलवडेवाडी (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील साठवण तलावाच्या बांधकामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

नलवडेवाडी, ता.कोरेगाव, जि.सातारा येथील जुन्या पाझर तलावात पाणीसाठा होत नसल्याने, सदर ठिकाणी रुपांतरीत साठवण तलाव करण्याबाबत, मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या मागणीनुसार रुपये ५०१.३१४ लक्ष किंमतीच्या नव्याने रुपांतरीत साठवण तलावाच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदरहू योजनेची प्रती स.घ.मी. किंमत ही प्रचलित मापदंडाच्या मर्यादेत असल्याने अंदाजपत्रकास महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ मार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर सदर योजनेस अपर आयुक्त जलसंधारण, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांनी रुपये ५,०१,२८,१९८/- इतक्या किंमतीची तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे. तद्नंतर रीतसर निविदा प्रक्रिया ही ई-निविदा अंतर्गत राबवून सर्वात कमी दराच्या ठेकेदाराला कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.
(२) व (३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील वाडी परिसरात प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची तस्करी होत असल्याबाबत

**(४५) * २२२५३ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यात वाडी परिसरात प्रतिबंधित हजारो किलोचे सुगंधी तंबाखू तस्करीचे मोठे रॅकेट पोलिसांनी जप्त केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात येथून मोठ्या प्रमाणात विदर्भात सुगंधित तंबाखूची तस्करी होत असून जेपी ट्रान्सपोर्ट कंपनीच्या गोदामामध्ये मोठ्या प्रमाणात तंबाखूचा साठा आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुंषगाने गुजरात सह अनेक राज्यांमधून येणारा तंबाखूचा साठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) गुन्हे शाखा युनिट क्र.१ नागपूर पथकाला दिनांक ०३/०८/२०२३ रोजी गस्तीवर असताना मे. जे.पी. ट्रांसपोर्ट कंपनी, प्लॉट १०२, मत्स्यगंध हाउसिंग सोसायटी, खडगांव रोड, लावा, वाडी, नागपूर या ठिकाणी सुगंधीत तंबाखू साठवित असून काही माल वाहनातून गोदामामध्ये साठवित असल्याचे आढळून आल्याने त्यांनी लेखी पत्राद्वारे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषधी प्रशासन, नागपूर यांना कळविले होते. त्यानुसार अन्न सुरक्षा अधिकारी यांनी पंचासमक्ष सुगंधीत तंबाखू व इतर मुद्देमाल जप्त केला. सदर प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिलेल्या लेखी फिर्यादीवरुन तीन व्यक्तींवर पोलीस ठाणे वाडी, नागपूर शहर येथे दिनांक ०४/०८/२०२३ रोजी गु.र.नं. ४७०/२०२३ कलम १८८,२७२,२७३,३२८ भा.दं.वि. सह कलम अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील कलम २६(२)(i), कलम २६(२)(iv), कलम ३(१)(zz)(iv),कलम २७(३)(e) व कलम २६(२)(a) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रतिबंधित असलेली सुगंधित तंबाखू गुजरातमधून येत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात एकूण ८ आरोपी असून त्यापैकी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ३ आरोपीना मा.न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केला असून उर्वरीत २ आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत. सदर प्रकरणामध्ये पोलीसांचा पुढील तपास सुरु आहे.

सुगंधित तंबाखुची विक्री व वाहतूक करणारे यांचेवर नागपूर ग्रामीण घटकामध्ये माहे जानेवारी, २०२३ ते माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत एकूण २२ गुन्हे दाखल करण्यात आले असून रुपये ९९,११,३४९/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, नागपूर शहरामध्ये माहे जानेवारी, २०२३ ते माहे ऑक्टोबर, २०२३ दरम्यान एकूण ५४ गुन्हे दाखल करण्यात आले असून रुपये १,२१,८४,४२१/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खरडगाव (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील कंत्राटी लाईनमन यांचा विद्युत पोलवर अपघाती मृत्यू झाल्याबाबत

**(४६) * २२५९९ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरडगाव (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील कंत्राटी लाईनमनचा विद्युत पोलवर काम करित असताना अपघाती मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरजगाव, खरडगाव (ता.नेर) परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी सदर प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत पावलेल्या कंत्राटी लाईनमनच्या कुटुंबियांना रुपये ५० लाख आर्थिक सहाय्य करून त्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबाबतची मागणी सर्वपक्षीय सामाजिक संघटना व सकल धनगर समाज बांधव तसेच शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटी लाईनमन मृत्यूप्रकरणी दोषींवर कारवाई करुन मृत पावलेल्या कंत्राटी लाईनमनच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत तसेच एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

महावितरण कंपनीचा बाहयस्त्रोत कर्मचारी श्री.क्षितिज दुर्योधन करडे यांचा दिनांक १३/१०/२०२३ रोजी सकाळी ९.४५ वाजण्याच्या सुमारास ११ के.व्ही. खरडगाव कृषी वाहनीवर जंपर जोडत असताना प्राणांतिक विद्युत अपघात झाला.
(२) हे अंशतः खरे आहे.

मृत पावलेल्या कंत्राटी कामगारांच्या कुटूंबियांना आर्थिक सहाय्य करुन त्यांच्या कुटूंबातील एका व्यक्तिला शासकीय नोकरीत सामावून घेण्याकरीता जिल्हा अध्यक्ष, धनगर अधिकारी-कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य शाखा यवतमाळ यांनी दिनांक १७/१०/२०२३ रोजी उप विभाग, नेर येथे निवेदन दिले आहे.
(३) विद्युत निरीक्षक, यवतमाळ यांनी दिनांक १७/१०/२०२३ रोजी सदर अपघाताची चौकशी केली आहे. सदर अपघात प्रकरणी ३३/११ केव्ही शिरजगाव या विद्युत पुरवठा उपकेंद्रातील डयूटीवर असलेले यंत्रचालक श्री.गजानन चक्करवार यांचेवर गुन्हा दाखल केला असून अटक करण्यात आलेली आहे. याबाबत पुढील तपास पोलीस करीत आहेत. तसेच, सदर यंत्रचालकाला महावितरणच्या सेवाविनियमानुसार निलंबित करण्यात आले आहे.

मृत बाह्यस्त्रोत कर्मचारी श्री.क्षितिज करडे यांच्या वारसांना विद्युत अपघातापोटी तातडीची मदत म्हणून रुपये २०,०००/- धनादेशाव्दारे देण्यात आलेले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियमानुसार मृत्यूपश्चात कायमस्वरुपी पेन्शन व एकरकमी नुकसान भरपाई मिळण्यासाठी राज्य कर्मचारी विमा महामंडळ (ESIC) यांच्याकडे दावा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तसेच भाईंदर (जि.ठाणे) तालुक्यामधून अंमली पदार्थांचा साठा जप्त केल्याबाबत

**(४७)** * **२२५८७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गुन्हे शाखा १ च्या पथकाने एका फार्म हाऊसमधील अंमली पदार्थाची प्रयोगशाळा उध्वस्त केली असून त्यामध्ये ३८ कोटी रुपये १८ किलो वजनाचे एमडी सह वाहने,

पिस्तूल, काडतूसे इ. जप्त केले असल्याचे तसेच भाईंदर (जि.ठाणे) मधील एका लॉजवरही सुमारे २५ लाखांचे मेफड्रोन व गावठी पिस्तूलासह अंमली पदार्थांचा साठा जप्त केला असून यामध्ये दोषी असलेल्या चौघांना अटक केल्याची बाब दिनांक २२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींमधील सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर असलेला समीर पिंजार हा फार्म हाऊसवर रासायनिक द्रव्य व पावडरवर प्रकिया करुन एमडी बनवून त्याची विक्री करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकारच्या घटना वारंवार होऊ नयेत तसेच ड्रग्स तस्करी करणाऱ्यांवर व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमिरा गुन्हे शाखा, कक्ष-१ नवघर पोलीस ठाणे येथे दिनांक १९/१०/२०२३ रोजी गु.र.नं. ६४०/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (सी), २२ (सी), २९ सह भा.ह.का.कलम ३, २५ व म.पो. अधिनियम १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) प्रमाणे दाखल असून सदर गुन्हयात एकूण ७ आरोपीतांना अटक करण्यात आली असून ते सद्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करते.

- मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत
- विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे "समन्वय अधिकारी" म्हणून शासन निर्णय दिनांक ०६/०१/२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतीक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालवधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्‌यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स,बॅनर्स तसेच पथनाट्यद्वारे जनजागृती केली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इतर मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळांचे थकीत अनुदानाबाबत

**(४८) * २२६४० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) आश्रमशाळांना गत तीन वर्षांपासून अनुदानच मिळाले नसल्यामुळे सुमारे १,३६७ आश्रमशाळा निधी अभावी अडचणीत असल्याची बाब दिनांक २७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आश्रमशाळांना शासनाकडून अनुदान मिळाले नसल्याने विद्यार्थ्यांच्या भोजनासह औषधोपचार आणि शैक्षणिक साहित्यासाठी आश्रमशाळेतील संचालकांना व्याजाने पैसे मागण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील सुमारे १,३६७ ओबीसी आश्रमशाळांचे थकीत अनुदान तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) राज्यात इतर मागास प्रवर्गाच्या (ओबीसी) शासन मान्यताप्राप्त कोणत्याही खाजगी अनुदानित आश्रमशाळा नाहीत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्याला महापुराचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(४९) * २२७३४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र तेलंगणा (ता.सिरोंचा जि.गडचिरोली) येथील सीमेवरून वाहणाऱ्या गोदावरी नदीवर मेडीगड्डा येथे उभारण्यात आलेल्या धरणाच्या पुलाला तडे गेल्याने महापुराचा धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाला तडे गेल्यामुळे तेलंगणा सरकारने दोन्ही मार्गावरील वाहतूक बंद करून पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेडीगड्डा येथे उभारण्यात आलेल्या धरणाच्या दुरुस्तीबाबत व सिरोंचा तालुक्याच्या महापुराच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, गोदावरी नदीवर बांधण्यात आलेल्या कालेश्वरम प्रकल्पाचा भाग असणाऱ्या मेडीगट्टा बॅरेजच्या प्रस्तंभ क्र.२० ला दिनांक २०/१०/२०२३ रोजी तडा गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तेलंगणा राज्याने बॅरेजचा पाणीसाठा टप्याटप्याने कमी केलेला असून सद्य:स्थितीत प्रकल्पामध्ये शुन्य पाणीसाठा आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रथमदर्शनी महापुराचा धोका निर्माण होण्यासारखी परिस्थिती दिसून येत नाही.

(२) तेलंगणा राज्याने कुठलीही जीवित हानी होऊ नये या दृष्टीने दोन्ही मार्गाने वाहतूक बंद करुन पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.
(३) मेडीगट्टा प्रकल्प हा तेलंगणा राज्याचा प्रकल्प असून प्रकल्पाचे संपूर्ण बांधकाम तेलंगणा शासनाने त्यांच्या निधीतून केले आहे. सबब, बॅरेजच्या पुनर्बांधणी/ मजबूतीकरण करण्याबाबतचे नियोजन तेलंगणा शासनामार्फत करण्यात येईल. तथापि, केंद्र शासनाअंतर्गत National Dam Safety Authority ने दिनांक ०१/११/२०२३ रोजी दिलेल्या पत्रातील निर्देशानुसार बॅरेजमधील पाणीसाठा रिक्त केला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत महापुराचा धोका संभवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.